# श्री साईलीला

या अंकांत—


- या हो शिरडीच्या राया !
- ईशू ख्रिस्त
- आमचें अमरत्व
- साहित्य-समालोचन
- बाल तुकारामाचे खेळ
- श्रीसाई-सकलांची माऊली
- सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथि उत्सव
- सत्पुरुष मामा परमानंद
- श्रीसद्गुरु साईबाबा यांची शिकवण
- इंद्रजित वध
- थोरा-मोठ्यांच्या गोष्टी
- भाव तैसें फळ
- भगवंताशीं आमचें नातें
- संतकवि महिपती
- नामदेवांची अमृतवाणी !
- शिरडी वृत्त


जानेवारी १९६८

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू

सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर.

टे. नं. २५५७२१

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

'धैर्य—धीर धरून वागणें म्हणजेच सबुरी. तिला कधींही दूर सारतां नये. नेहमीं तिच्या सहवासांत राहिलें पाहिजे. कोणतेंही लहानमोठें संकट येवो. त्या त्यावेळीं तीच तुमचें रक्षण करील. पुरुषांचा खरा पुरुषार्थ तिची कांस धरण्यांत आहे. तुमच्या पापाचें, तापाचें नि दैन्याचें निवारण करण्याचें सामर्थ्य तिच्या ठायीं आहे. मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें संकटप्रसंगीं बचाव करणारी तीच. तिची कांस धरणाऱ्यानें कशाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं."

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४६ वें ] जानेवारी १९६८ [ अंक १० वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

सर्वसाधारणपणें पहातां असें दिसून येतें कीं, माणसाला स्वतःची स्तुति नि दुसऱ्याची निंदा ऐकण्यांत मेला आनंद वाटत असतो. माणूस स्तुतिप्रिय आहे. ज्याला प्रशंसा आवडत नाहीं असा माणूस विरळा. विरळा असला तरी ज्याला आत्मस्तुति मनापासून आवडत नाहीं अशीं माणसें होऊन गेलीं व आजही कुठें कुठे वावरतांना आढळून येतात. आत्मस्तुति परनिंदा यांसी जो पारखा तो माणूस फार वरच्या कोटींतील समजला पाहिजे.

या अंकांत दुसरीकडे ज्यांचा अल्पपरिचय करून देण्यांत आला आहे ते भाई परमानंद हे त्या कोटींतील महाभाग होते. त्यांनीं इतरेजनांसाठीं नि दुःखितांसाठीं पुष्कळ; परंतु त्याची कोणी कोणत्याही स्वरूपांत केलेली वाच्यता त्यांना मनापासून आवडत नसे. जन्मभर ते आत्मस्तुतीपासून दूर दूर राहिले. तसेंच परनिंदेचा स्पर्श त्यांना कधींही झाला नाहीं.

या जगांत आपण आपल्या सभोंवार जीं माणसें वावरतांना पहातों, त्यांच्या ठायीं गुण आणि दोष यांचें मिश्रण झालेलें आढळून येतें. सर्वगुणसंपन्न असा एक परमेश्वरच. किंवा त्या पदापर्यंत पोहोंचण्यासाठीं अविरत धडपडणारा. प्रत्येक माणसांत कांहीं ना कांहीं दोष हे असतातच.

परंतु दुसऱ्यांची निंदा ऐकणें व त्यांत आपण यथाशक्ति भाग घेणें हें फार वाईट. त्यामुळें माणूस दुसऱ्याचे दोष शोधण्याचा उद्योग करायला लागतो. ती खोड अत्यंत वाईट. आपण दुसऱ्याचे गुण पहावे नि त्यांच्या अनुकरण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा.

दुसऱ्याचे दोष पहाण्याची व त्याचें संशोधन नि वाच्यता करण्याची आपणास काय बरं जरूरी? आपण गुण तेवढे पहावे आणि ते उचलावे. दोष पहाण्याच्या या दुष्ट खोडीमुळें काय होतें माहीत आहे? तेच विचार आपण मनांत घोळवितों व त्याचें संस्कार आपल्याही मनावर झाल्याशिवाय रहात नाहींत.

दुसऱ्याचें दोष शोधून काढण्यांत किंवा त्यांचे चर्वितचर्वण करण्यांत आपण कां बरं वेळ व्यर्थ दवडावा? त्यांत कोणाचाही फायदा नसून तोटा मात्र मुबलक आहे ही जाणीव ज्या दिवशीं होईल तो दिवस भाग्याचा!

हा जो मानव-जन्म आपणास मिळाला आहे तो का दुसऱ्यांचें दोष शोधून काढून ते चव्हाट्यावर मांडण्यासाठीं? त्यापेक्षां करण्यासारखीं सत्कार्यें कितीतरी आहेत. कांहींच करवत नसेल किंवा इच्छा होत नसेल तेव्हां देवाचें नामस्मरण करण्यांत वेळ दवडावा; परंतु परनिंदा, परक्यांचें दोषाविष्करण करण्याचें कधींहि मनावर घेऊं नये. तें महत्पाप आहे असें समजावें. तो दुराचार आहे याची मनाशी खूणगांठ बांधावी.

दुसऱ्यांच्या गुणांचें वर्णन करावें; अवगुणांचें किंवा दोषांचें नव्हे. तुम्ही गुणांचें वर्णन करतां करतां स्वतः गुणी व्हाल. अवगुणांचे किंवा दोषांचे वर्णन किंवा चिंतन करून तुमच्या पदरांत काय पडणार आहे?

दोष बाहेर काढायचे असले, दोषांचें संशोधन करायचें असलें तर स्वतःचे दोष शोधून काढून, बारकाईनें त्यांचें संशोधन करून ते नेस्तनाबूत करण्याचें, त्यांना प्रयत्नेंकरून गाडून टाकण्याचें तरी व्रत घ्या. त्यामुळें तुमचा फायदा होईल.

बाबांचें पुण्यस्मरण करून आपण असें व्रत घेतलें पाहिजे कीं, इतके दिवस झालें तें गंगार्पण; परंतु यापुढें मी दुसऱ्याची निंदानालस्ती ऐकणार नाहीं, किंवा स्वतः ती करणार नाहीं. जेथें निंदेचा, नव्हे निंदकांचा अड्डा बसला आहे, तेथें मी क्षणभरहि थांबणार नाहीं, निंदा ऐकणें व निंदा करणें हें महत्पाप आहे असें मी यापुढें समजेन. जेव्हां जेव्हां मला दुसऱ्याची निंदा करण्याची लहर येईल त्या त्यावेळीं मी देवाचें नांव घेईन किंवा बाबांचें नांव घेऊन त्या पापापासून दूर राहीन.

—संपादक



# या हो शिरडीच्या राया !

[ चाल : बाळ जातो दूर देशा ]

याहो शिरडीच्या राया, दिवस माथ्यावरी आला ।
तुमच्या दर्शनाला दारी भाविकांचा मेळा ॥ धृ० ॥

अन्हिकादि सर्व झाले वैश्वदेव भोग केले ।
उठा भोजनास राया, दिवस माथ्यावरी आला ॥ १ ॥

लक्ष्मीबाई साद, घालिते हो साई ।
दोन घासांसाठीं बाबा धांव झणीं घेई ॥
नका लावूं वेळ राया, दिवस माथ्यावरी आला ॥ २ ॥

द्वारकामाई मधें दळिलें—कांडिलें ।
शुचीर्भूत होऊनी साई अन्न शिजविलें ।
घ्याहो दोन घांस राया, दिवस माथ्यावरी आला ॥३॥

नवधान्याची खिचडी तशीच जनांची ।
दरबारी झाली साई दीन दुबळ्याची ॥
नका अन्त पाहूं राया, दिवस माथ्यावरी आला ॥ ४ ॥

आज दिवस सोनियाचा, आनंदें लाभला ।
दर्शनानें साई तुमच्या परमानंद झाला ॥
जातों माघारी हो राया, दिवस माथ्यावरी आला ॥५॥

—दत्तात्रय बळवंत पोतनीस

# ईसू ख्रिस्त

—संत विनोबा

आपल्याकडे अनेक महापुरुष होऊन गेलेत. ज्ञानदेव, कबीर वगैरे. तसे तिकडे पॅलेस्टाईनमध्यें एक फार मोठे महापुरुष होऊन गेले. त्यांचें नांव येशू ख्रिस्त. जसें आपण रामाला अवतार मानतो, कृष्णाला अवतार मानतो, तसें ते लोक येशूला अवतार मानतात. लोकांनी त्यांचा फार छळ केला. शेवटीं त्यांना खिळे ठोकून मारलें. कधीं कधी लोक असे मूढ बनतात. महापुरुषाचें म्हणणें त्यांना समजत नाहीं. आणि म्हणून ते त्यांना त्रास देतात. आपल्याकडेहि ज्ञानदेव, तुकाराम वगैरे संतांना त्रास दिला. तसेंच येसूला खिळे ठोकून मारलें. परंतु त्यानंतर कोट्यावधी लोक त्याचे भक्त झाले. युरोपमध्यें जितकीं राष्ट्रें आहेत, तीं सर्व ख्रिस्ती आहेत. हिंदुस्तानांतहि कोटी, सव्वा-कोटी ख्रिस्ती लोक आहेत.

जो धर्म जगांत एवढा पसरला, त्या धर्मानें काय शिकविलें? मनुष्यमात्राची सेवा करावी आणि दुर्जनतेचा प्रतिकार सज्जनतेनें करावा. कोणी म्हटलें, 'मी तुला मारतो,' तर म्हणावें, 'मार, किती मारायचें तेवढें मार, मी हात टाकत नाहीं आणि रागवत नाहीं.' कोणी तुम्हाला मारायला आले आणि तुम्ही पळालांत, तर तुम्ही भित्रे झालात. पण पळ न काढता, उलट न मारता, म्हणावें, 'मार, तुझ्या मर्जीची गोष्ट आहे. मी मार खातो.' मी मारणार नाहीं, रागावणार नाहीं, प्रेमच करणार, असें वाटलें पाहिजे.

(बाबा बोलत असतां पांच मिनिटें स्तब्ध राहिले. मुलांकडे पहात होते. मुलें हसू लागलीं. बाबाहि हसू लागले.)

ह्यांना वाटतें आहे, कीं असा कसा मार खायचा? एकदम हिंमत होणार नाहीं, पण तसा प्रयत्न केला पाहिजे. आपण रागावलो नाहीं, शांत राहिलो तर मारून मारून त्याचें हात दुखणार. आपण काय करायचें? मारत नाहीं, रागवत नाहीं, शांतीने नामस्मरण करतो—'जयजय राम-कृष्ण-हरि' एक प्रहार मिळाला 'जयजय राम-कृष्ण-हरि' दुसरा प्रहार मिळाला 'जयजय राम-कृष्ण-हरि' तिसरा प्रहार मिळाला. असें मनुष्य करू लागला देवाचें नांव घेऊ लागला तर मारणारा थकून जाईल.

एकदा काय झालें? वाल्मिकी होते. त्यांनी एवढें मोठें रामायण लिहिलें. रामायणात काय आहे?

—रामाची कथा.

तर एवढें मोठें रामायण ज्या वाल्मिकींनी लिहिलें, ते पूर्वी काय करीत असत? दरवडे घालीत असत. वाटेने येणाऱ्या जाणाऱ्याला लुटायचे व मारून खायचें हा त्यांचा धंदा होता. नारद त्या रस्त्यानें जात होते एकदां. नारदाच्या हातांत नेहमीं वीणा असते. 'रामकृष्णहरि' जप करीत ते येत होते. तर तो वाल्मिकी वाटमाऱ्या, लुटारू मारायला धांवून आला. नारद शांत होते. वाल्मिकीला आश्चर्य वाटलें कीं हा तर पळूनहि जात नाहीं किंवा मला मारायला धांवूनहि येत नाहीं. असा कसा हा माणूस. हा तर कांहीं तिसराच प्रकार दिसतो. तो नारदासमोर ताठ उभा राहिला. नारदांनीं त्याला विचारलें, 'तूं माणसाला मारून काय करतोस?'

'शिजवून खातो. बायको शिजवते.'

'असें केल्यानें पाप लागतें ना?'

'हो लागतें.'

'मग असें का करतोस?'

'संसारासाठीं.'

'तूं घरीं जाऊन बायकोला विचारून ये कीं, मी माणसाला मारतो व तूं शिजवितेस, तर पापाचा अर्धा वाटा तूं घेशील कां? तूं विचारून ये तोपर्यंत मी येथें थांबतो.'

तो घरीं गला आणि त्यानें बायकोला विचारलें, तर बायको म्हणाली, मी कशाला वाटेकरी होईन. तूं ज्वारी आणलीस तर मी भाकरी करीन. तूं गहू आणलेस तर मी पोळी करीन. तूं माणसांचीं मुंडकीं आणतोस तर मी तीं शिजवीते. 'मला कसल पाप?' हें ऐकल्यावर त्याचे डोळे उघडले. बायकोसाठी माणसें मारली पण ती पापाचा वाटा घ्यायला तयार नाहीं. त्याला फार पश्चात्ताप झाला. तो नारदाजवळ आला आणि म्हणाला, माझ्या हातून फार पाप झालें. आता मी काय करूं?' नारद म्हणाला, घाबरू नकोस. प्रभूला शरण जा. मग तूं कितीहि पापी असलास तरी तुझा उद्धार होईल. मग त्यानें ईश्वर-स्मरण केलें व त्याचा उद्धार झाला. कितीहि दिवसांचा पापी असला तरी पश्चात्ताप झाला तर सुधरायला पळभरहि लागत नाहीं. समजा अंधार आहे आणि तूं कंदील घेऊन तेथें गेलास तर अंधार नाहींसा होईल कीं नाहीं?

—हो होईल.

तसेंच भगवंताची भक्ति असली तर मनुष्याचें सर्व पाप एका क्षणांत नाहींसें होईल. नारद मार खायला तयार झाला म्हणून वाल्मिकीचें एवढें परिवर्तन झालें. पुष्कळ लोक तर असें असतात कीं आपण जर हिमतीनें त्यांच्या समोर उभें राहिलों तर ते मारीत नाहींत. एक होता राक्षस–आज मी तुम्हांला गोष्टीच सांगणार आहे.

त्या राक्षसानें एका माणसाला पकडलें. आणि दिवसभर तो त्याला काम सांगू लागला. काम करता–करता माणूस थकला आणि म्हणाला, कीं आतां मी विश्रांति घेतो. तर राक्षस म्हणाला, कीं काम कर, नाहीं तर मी तुला खाऊन टाकतो. माणूस भ्यायला आणि काम करूं लागला. राक्षस त्याला क्षणभरहि स्वस्थ बसूं देईना. सारखा धाक घालू लागला. अखेर, माणूस कंटाळला व म्हणाला, कीं खात असशील तर खा, मी काम करीत नाहीं. पण राक्षसानें कांहीं त्याला खाल्लें नाहीं. त्याला काम करायला माणूस हवा होता. म्हणून त्यानें त्याला खाल्लें नाहीं. म्हणजे काय झालें ? माणसानें भय सोडलें म्हणून राक्षसानें त्याला खाल्लें नाहीं.

येशु खिस्ताने हेंच शिकविलें. भ्यायचें नाहीं, आणि समोरच्या माणसाला भय घालायचें नाहीं. हें लोकांना समजलें नाहीं, म्हणून त्यांनी त्याला पकडलें. आणि खिळे ठोकून मारलें. आणि तो काय म्हणाला ? तो म्हणाला, हे देवा ! हे लोक अज्ञानी आहेत, त्यांना क्षमा कर. असा तो महापुरुष होऊन गेला.

तो देवाला पिता म्हणायचा. ज्ञानदेवांनीहि परमेश्वराला बाप नांव दिलें आहे. ते म्हणतात, 'बापरखुमादेवीवरु' म्हणून येथे 'ईशुपिता' आले. म्हणजे येशूने ज्याला पिता मानला तो भगवंत.



# आमचें अमरत्व

ज्याला आपल्या वाट्यास सदासर्वकाळ सुख व आनंद यांचा लाभ व्हावा असें वाटतें त्यानें कामनाक्षय केला पाहिजे. कशाचीहि इच्छा करायची नाहीं! असं कां बरं! याचें कारण जो कोणी नाना प्रकारच्या इच्छा बाळगतो त्याला सुखोपभोगांची लालसा असते–ती नेहमीं वाढत जाणारी असते. ती लालसा परिपूर्ण झाली नाहीं म्हणजे जीवन दुःखमय होतें. अभाव जाणवूं लागतो व त्यामुळें असमाधान निर्माण होतें. अशी ही परस्परावलंबी साखळी आहे. मन शांत राखता आलें पाहिजे; परंतु मनांतल्या इच्छा, कामना, लालसा थैमान घालूं लागल्या म्हणजे त्यांच्या प्राप्तीसाठीं खळबळ, मळमळ नि तळमळ सुरू होते. त्यामुळें अंतःकरण शुद्ध, निर्मळ राहूं शकत नाहीं तेथें शुद्ध प्रेमाला जागा राहूं शकत नाहीं; आणि मग मनुष्य सुख व आनंद यांस पारखा होतो.

इच्छा, मनकामना यांचा अंत लावतां आला पाहिजे. त्याशिवाय कोणाच्याही वाट्यास निश्चिंतता, निरामयता येणार नाहीं. कामना, इच्छा नेस्तनाबूत करायच्या म्हणजे काय? म्हणजे आम्ही स्वतःवर विजय मिळवायचा. फार कठीण आहे ही गोष्ट. ज्यानें स्वतःला जिंकलें, त्याला या जगांत जिंकण्यासारखें कांहीं रहात नाहीं.

मनांत येणाऱ्या इच्छा, कामनांच्या लाटांवर विजय मिळवितां आला म्हणजे जीवन एकप्रकारच्या बेपर्वाईनें, मस्तीनें बेफाम होत असतें. ती मस्ती ही एक थोर नि वांच्छनीय गोष्ट आहे. त्या मस्तीपुढें तिन्हीं लोकींची संपदाही फिकी पडेल. ही मस्ती हेच या जीवनाचें सार सर्वस्व आहे. जगांत इतर जें कांहीं मिळविण्यासारखें आहे तें सर्व मिळविलें आणि ही मस्ती जर वाट्याला आली नाहीं, जीवन परिपूर्ण नाहीं झालें तर कांहीं मिळालें नाहीं असें समजावयाचें.

अशी ही वांछनीय मस्ती केव्हां वाट्यास येते? जेव्हां मनांतील साऱ्या कामनांस आम्हीं कायमची मूठमाती देऊं तेव्हां!

मला हें हवें, मला तें हवें! माझी ही इच्छा पूर्ण झाली नाहीं आणि ती इच्छा पूर्ण झाली नाहीं, ही रडारड जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत दुःखाची आणि दुःखाची ताटातूट होणार नाहीं.

जीवनांतील ही इच्छा, भोगवृत्ति नाहींशी कशी होणार? हा माझा देह

या माझ्या देहाला अमूक आणि तमूक सुख पाहिजे, माझा हा संसार; या संसारांत मला अमूक उणीवा आहेत त्या दूर केल्याशिवाय मी सुखी होणार नाहीं. मग त्या त्या वस्तूंबद्दल मनांत आसक्ति उत्पन्न होते. या आसक्तीमुळें मनांत नानाप्रकारच्या लालसा उत्पन्न होतात. आणि मग मनुष्य त्या जाळ्यांत अडकतो, अडकतो आणि फसतो.

आसक्तीमुळें काय काय होतें ? जें मिळालें असेल त्याबद्दल ममता आणि जें नाहीं मिळालें त्याबद्दल सतत चिंतन. मिळालें किंवा जें जवळ आहे त्याबद्दल ममत्त्व म्हणजे काय ? त्यांत माझे पण उत्पन्न होतें. त्याबद्दल मोह वाटूं लागतो. आणि ती वस्तु कोणी घेईल कां याबद्दल भीति वाटूं लागते.

जें मिळवितां आलें नाहीं त्याचें चिंतन करीत राहिल्यानें काय होतें ? हें चिंतन निरर्थक असतें. चिंतन केल्यानें त्या वस्तुची प्राप्ति होते, असें थोडेंच आहे ? त्यामुळें काय होतें ? दुःख, निराशा, अस्वस्थता वाट्यास येते.

तेव्हां आशक्ति ही फार वाईट. त्यापासून आपण कटाक्षपूर्वक सुटका करून घेतली पाहिजे. कारण कामनारहीत होणें याचाच अर्थ सुखी होणें.

संसारांतील वस्तूबद्दल अनासक्ति वाटली पाहिजे. ती केव्हां वाटेल ? ती मृत्यूमुळें नाहींशी होईल किंवा त्यागामुळें नाहींशी होईल. मृत्यू आणि त्याग. दोहोंत फार मोठें अंतर आहे. मृत्यू आला तरी पुन्हां जन्म ठरलेला आणि त्याग ? त्यागामुळें तुम्हीं परमपद प्राप्त करून घेऊं शकता; मृत्यू तुम्ही बोलावून येत नाहीं. ध्यानीमनीं नसतां तो छापा घालतो. आणि त्याग ? तो तुम्ही निर्धारपूर्वक करायचा असतो.

तेव्हां मृत्यूची वाट न पहातां तुम्हीं त्यागाच्या तरवारीनें इच्छा, कामनांचे तुकडे करून टाकले पाहिजेत. अशा स्थितीप्रत येणें म्हणजे तें जिवंतपणाचें मरण होय. परंतु तें खऱ्या अर्थानें मरण नव्हे. तें दीर्घ जिवित्व; तें अमरत्व होय !

त्या अमरत्वासाठीं आम्ही झगडायचें आहे !

# साहित्य-समालोचन

## भारतीय सण आणि उत्सव

( लेखक : सदानंद चेंदवणकर, प्रकाशक : निर्णयसागर प्रेस, २६–२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई नं. २. पृष्ठें २६५, किंमत पावणेचार रुपये. )

आपल्या देशांत नानाप्रकारचे उत्सव, सण, जयंत्या वगैरे कमी अधिक समारोहानें साजऱ्या केल्या जातात. सण, उत्सव नाहीं असा एखादा महिनाहि जात नाहीं. आणि श्रावण, भाद्रपद, आश्विन यासारख्या महिन्यांत तर उत्सव नि सण यांची गर्दी उसळून गेलेली असते. अशा प्रसंगीं आपण मौज करतों, गोडधोड पक्वान्नें झोडतों आणि खूप रंगूनहि जातो; परंतु प्रत्येण सण, उत्सव किंवा जयंति कां साजरी केली जाते, त्यासंबंधींचा पूर्वेतिहास काय आहे याची माहिती मात्र आपणास नसते. प्रत्येक सण किंवा उत्सव याच्या मागें कांहीं ना कांहीं उद्देश असतो, कोणतें तरी निमित्त त्याला झालेले असते. त्याची माहिती आजच्या काळांतील विद्यार्थ्यांस व इतर सर्वांना असणें जरूर आहे. उत्सव, सण हे संस्कृती संरक्षक असून त्यांत हिंदु धर्माभिमान्यांनीं समजून घ्यावें असें पुष्कळ असते.

श्री. सदानंद चेंदवणकर यानीं प्रस्तुत पुस्तकांत केवळ महाराष्ट्रांतीलच नव्हे तर तामीळनाड, आंध्र, केरळ, माळवा ह्या इतर प्रांतांतील प्रमुख सणांची उत्सवांची माहिती परिश्रमपूर्वक मिळवून ती या उपयुक्त नि संग्राह्य पुस्तकाच्याद्वारे वाचकांस सादर केली आहे. मधून मधून प्रासंगिक चित्रेंही देण्यांत आहेत.

या पुस्तकांत वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांतील यच्चयावत् सणांची पूर्वपीठिका व माहिती देण्यांत आली आहेच; त्याशिवाय तामीळनाड ( पोंगल ), आंध्र ( बाटकम्मा ), केरळ ( तिरुवोणम् ), माळवा ( डोलग्यारस ) या सणांचीही माहिती देण्यांत आली आहे त्याचप्रमाणें दासनवमी, तुकारामबीज, एकनाथषष्ठी, बुद्धजयंती, पर्शुरामजयंती, नृसिंहजयंती, महावीरजयंती, शंकरचार्यजयंती यासारख्या अनेक महत्त्वाच्या जयंत्यांचाही समाचार लेखकानें घेतला आहे. फार काय ! शिर्डी येथील साईबाबांचा उत्सव, जगन्नाथपुरीचा रथोत्सव ह्यासारख्या उत्सवांचीही सांगोपांग माहिती देण्याची दक्षता दाखविली आहे.

साधी भाषा, मोठा टाईप, सुंदर छपाई नि बांधणी यांचा सुंदर संगम येथें पहायला मिळतो.

प्रत्येक हिंदुमात्रानें हें पुस्तक संग्रहीं ठेऊन तें मुलाबाळांच्या वाचण्यांत येईल याबद्दल दक्षता बाळगणें जरूर आहे असें वाटतें.

**हितोपदेश**—मित्रलाभ भाग पहिला.

(प्रकाशक–निर्णयसागर बुक प्रकाशन; डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २; अनुवादक–वि. के. छत्रे. किंमत ३ रु.)

लहानापासून थोरांपर्यंत सर्वांचें हित व्हावें या हेतूनें केलेला उपदेश तो हितोपदेश. प्रत्येकास व्यवहारांत नाना प्रकारच्या अडचणी येतात. त्यावेळीं कोणीतरी योग्य सल्ला देण्याची जरुरी असते. सल्लागार नेहमीं कुठून मिळणार. अडीअडचणीच्या प्रसंगीं ज्याचा त्यालाच निर्णय घेऊन पाऊल पुढें टाकावें लागतें. अशावेळीं आपण ज्या उपदेशाच्या गोष्टी ऐकतो किंवा वाचतो त्यांचा फार उपयोग होत असतो. संस्कृतांत पंचतंत्र, हितोपदेश यासारखीं वेळप्रसंगीं उपयोगी पडणाऱ्या पुस्तकांतून जनावरे, पक्षी किंवा माणसें यांच्या रूपानें गोष्टी सांगितल्या आहेत. इसापनीति तर सर्वांना माहीत आहेच. गोष्टींच्या रूपानें केलेला उपदेश सर्वांच्याच पचनीं पडतो. अशा गोष्टींत नानाप्रकारचीं हितपर तत्त्वें गोष्टींच्या रूपानें गुंफण्यांत आलेलीं असतात.

तशाच प्रकारचा श्री. छत्रे यांचा हा प्रयत्न आहे. पंचतंत्र, हितोपदेश वगैरे गोष्टीरूप पुस्तकांतील संस्कृत श्लोकांची निवड करून त्यांचा सुलभ मराठी पद्यमय अनुवाद करून व जरूर तेथें तेथें गद्यमय खुलासा करून सर्वांना सहज आकलन करतां येईल अशा स्वरूपांत ही रचना करण्यांत आलेली आहे. श्री. छत्रे यांचा संस्कृतचा व्यासंग दांडगा आहे. तो त्यांचा एक आवडता छंद आहे. पद्यरचना अत्यंत सोपी नि सुटसुटीत आहे. कुठेंही अडखळायला होत नाहीं, हा या रचनेचा एक प्रमुख गुण आहे. यांतील काव्योक्ति पठण करण्यासारख्या व वेळप्रसंगीं व्यवहारांत उपयोगी पडण्यासारख्या आहेत.

या मित्रलाभांत एकंदर आठ कथा–पद्यमय व गद्यमय देण्यांत आल्या आहेत. एकींतून दुसरीचा, दुसरीतून तिसरीचा असा त्यांचा उगम होत गेला आहे. या कथांपासून वाचकानें कोणता बोध घ्यावा हेंही अगदीं थोडक्यांत नमूद करण्यांत आले आहे.

सोप्या नि सुटसुटीतपणाचे हे १।२ नमुने पहा—

रक्षी पिता स्त्रीप्रति जों कुंवार<br>
तारुण्यकालांत तिचा भ्रतार

रक्षी तिला वृद्धपणांत पुत्र
स्वतंत्रतेला वनिता अपात्र

किंवा—

जी दक्ष गेहीं निज, तीच भार्या
जी दे गुणी संतति तीच भार्या
पति जिला प्राणचि तीच भार्या
पतींत निष्ठा दृढ तीच भार्या

या रचनेचें महत्त्व लक्षांत घेऊन पुणें विद्यापीठानें त्याच्या छपाईसाठीं अनुदान दिलें; तसेंच कांहीं संस्कृतज्ञ विद्वानांनीं श्री. छत्रे यांच्या सुटसुटीत रचनेची मुक्तकंठानीं प्रशंसा केली आहे. यावरून या रचनेचें महत्त्व सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

निर्णय सागर बुक प्रकाशन संस्थेनें, लहान थोरांच्या दृष्टीनें उपयुक्त अशा या रचनेस उत्तम प्रकारें प्रसिद्धी देऊन उपदेशपर ग्रंथ रचनेंत मोलाची भर घातली आहे.




## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह ( स्टॅंप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

# बाल तुकारामाचे खेळ

लेखक : द. मो. चित्रे

रम्य तें बालपण ! मग तें बालपण थोरांचें असो वा सामान्यांचें असो. बालपण तें बालपण. संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराजांचेंहि बालपण असेंच रम्य होतें. आपल्या सवंगड्याबरोबर निरनिराळ्या प्रकारचे खेळ ते खेळत, मनसुराद हंसत, मनःपूत आनंद उपभोगित.

मोठेपणी त्यांना ह्या बालपणांतील खेळांची आठवण होई आणि मग ते आपला सवंगडी पंढरपूरचा पांडुरंग ह्याच्याबरोबर तेंच बालपणचे खेळ खेळत. आणि खेळांत दंग झाल्यावर त्यांच्या मनांत विचार येत ते अध्यात्म्याशी निगडित असत.

"झेला रे झेला वरचेवर झेला । हातिचे गमावी तो पाठीं साहे टोला ॥१॥धृ॥
त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ ६ ॥
आगळा होऊनि घरी वरिचिया वरी चपळ तो जिंके गांव्या ठके येरझारी ॥ २ ॥
हातीं सांपडलें उभें बैसोनेदी कोणी । सोरी मागे सोरी घेती ओणवें करूनि ॥ ३ ॥
डांई पाडिलिया सोसी दुःखाचे डोंगर । पाठीवरी भार भोंवता ही उभा फेर ॥ ४ ॥
तुका म्हणे सुख पाहे तयाचे आगळें । जिंकी तो हरवी कोणा एका तरी काळें ॥ ५ ॥
निदान एकदांतरी श्रीतुकाराम महाराज विटेवर उभा असलेल्या श्रीपांडुरंगाला हरवींत ! धन्य, धन्य तो खेळ !

बाल-गोपाळांचा खेळच असे तो. खेळून खेळून दमले की एकमेकांना खाऊ देत. गड्यांच्या मध्यभागी श्रीहरी बसे आणि मग गडी एकमेकांना घांस देत.

"बैसवुनी फेरी । गडियां मध्यभागीं हरी । अवघियांचे करी । समाधान सारिखे ॥ धृ० ॥ पाहे तो देखे समोर । भोगी अवघे अवघे प्रकार । हर्षें झेली कर । कवल मुखीं देती ते ॥ १ ॥ बोले बोलतिया सवे । देतील तें त्यांचें घ्यावें । एक एका ठावें । येर येरा अदृश्य ॥ २ ॥ तुका म्हणे देवा । बहु आवडीचा हेवा । कोणाचिया जीवा । वाटो नेदी विषम ॥ ३ ॥ "खेळांमध्यें सर्व सवंगड्याचें समाधान होत असे. रुसणें-फुगणें, चीडा-चीड अजिबात नसे. समर्थां घरचा खेळ तो ! आणि शिवाय तो खेळ ज्याच्या त्याच्या आवडीचा असे." आम्हां निकट वासें । कळों आलें जैसें तैसें । नाहीं अनारासें कान्होबाचे अंतरी ॥ धृ० ॥ गोडी आपुल्या भावना । ऐसी

जयाची वासना। कर्माचा देखणा। पाहे लीला कौतुक ॥ १ ॥ खेळ खेळे न पडे डांई। ज्याजा भार त्याच्या ठायीं। कोणी पडतील डांई। कोणी कोडीं उगवीती ॥ २ ॥ तुका म्हणे कवळ। हातीं घेऊनी गोपाळ। देतो ज्याचे बळ। त्यांसि तेसा विभाग ॥ ३ ॥"

राजा विठोबा सांवळा खेळ खेळून दमला की श्री तुकाराम महाराज राणी रखुमाबाईला खेळण्यासाठीं पाचारण करीत. राणी रखुमाबाई इतर लहानग्या मुलींना उद्देशून म्हणत, फुगडी ग फुगडी घालितां उघडी राहे। लाज सांडोनि एका एकी पाहे ॥ ध्रु० ॥ फुगडी गे अवघें मोडी गे। तरीच गोडी गे संसार तोडी गे ॥ १ ॥ मागें जें शिकली होतीस पोटीं तेंचि विचारूनि आतां उच्चारी ओठीं ॥ २ ॥ त्रिगुणांची वेणी तुझे उडते पाठी। सावरूनि धरी घाली मूळबंदी गांठी ॥ ३ ॥ आगळें पाऊल जिंकें एका एक। पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥ ४ ॥ तुका म्हणे तुजमजमध्यें एक भाव। सम तुकें बार घेऊ पावों उंच ठाव ॥ ५ ॥ फुगडी नंतर हुंबरीचा खेळ सुरू होई. तुशी कोण घाली हुंबरी। साही पांगल्या अठरा चारी ॥ ६ ॥ सहस्र मुखावरी हरी। शेष शिणविलें ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ चेंडुवासवें घालती उडी। नाथिला काळिया देऊनी बुडी ॥ २ ॥ अशुद्ध पीतां करुणा नाहीं ॥ तुवा माउशी ही मारियेली ॥ ३ ॥ रावणाचें घर बुडविलें सारें। त्याची शंडापोरें मारियेली ॥ ४ ॥ जाणो तो ठावा आहेसि आम्हां। तुवां आपुला मामा मारियेला ॥ ५ ॥ याशी खेळता नाश थोर। तुकया स्वामी सारंग धरू ॥ ६ ॥

विठोबा पुन्हां खेळांत उतरे आणि मग हमामा सुरू होई. "हमामा रे पोरा हमामा रे। हमामा घालतां ठकले पोर। करी येरझार चौऱ्यांशीची ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ पहिलें पहारा रंगासि आलें। सोहं सोहं में बार घेतले। देखोनि गडी तें विसरलें। डोई पडिलें आपणची ॥ ध्रु० ॥ दुसऱ्या पहारा महा आनंदे। हमामा घाली छंद छंदे। दिस वाढे तों गोड वाटे। परि पुढें नेणें पोर काय होते ते ॥ २ ॥ तिसऱ्या पहारा घेतला बार। अईपणें पाय न राहे स्थिर। सोस सोस करितां डांई पडसी। सत्य जाणें हा निर्धार ॥ ३ ॥ चौथ्या पहारा हमामा। घालिसी कांपविसी हातपाय। सुन्या पाटिलाचा पोर यम। त्याचे पडसील डांई ॥ ४ ॥ हमामा घालितां म्याला तुका त्यानें सांडिली गड्याची सोई ] यादवांचा मूल एक विठोबा त्यासवे चारितो गाई ॥ ५ ॥" बैठा खेळ म्हणून श्री तुकाराम महाराज कोडेही घालीत. "नुगवे तें उगवून सांगितलें भाई। घालुनियां ताळा आतां शुद्धराखा घाई ॥ ध्रु० ॥ आतां कांहीं नाहीं राहिलें। म्या आपणा आपण पाहिलें ॥ १ ॥ कमाईस मोल येथें नका रीस मानू। निवडूं नये मज कोणा येथें वानू ॥ २ ॥ तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी। जयेजत मग खेवटिला एक वेळीं ॥ ३ ॥".

श्री तुकाराम महाराजांचे बालपणचे खेळ किती विविध होते। चेंडूफळी, फेरी, फुगडी, हुंबरी, हमामा, कोडें आणि किती तरी, खेळ खेळण्यामुळें शरीर आणि मन प्रसन्न होतें. आणि प्रसन्न मन पांडुरंगाचा धांवा करतें व त्यांत विलीन होतें. Healthy mind resides in healthy body म्हणतात तेंच खरे! शालेय शिक्षण क्रमांक खेळाचा अंतर्भाव केला जातो तो याच कारणासाठीं. आणि ही सृष्टी तरी दुसरें काय आहे? परमेश्वराच्या सारीपटांतील एक डाव!

The whole creation is thy divine play, my Father.

## श्रीसाई—सकलांची माऊली

जनां भासवी सोंग करूनी, 'मी साईभक्त'
स्वार्थी, लोभी, कपटी, लुच्चा मी विषयासक्त.

सुखोपभोगी तुझी आठवण मुळींच मज नाहीं,
परी संकटीं पडतां धांवे रडत तुझ्या पायीं.

तुला फसवितो पदोपदीं मी परि तूं करुणाघन,
धरिशीं पोटीं भक्तिभावें करितां मी वंदन.

श्रीसाई तूं खरा सद्‌गुरु सकलांची माउली,
देई आसरा सर्व पांथिका वृत्ताची साउली.

भक्तीचा मम झरा आटतो सरतां गरज तुझी,
हाय हाय रे! क्षमा करी मज, धिक् धिक् धिक् माझी!

—गो. रा. भट

# सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथि उत्सव

श्री साईबाबांच्या महाप्रयाणास पुढील वर्षी ( विजयादशमी ) पन्नास वर्षे होत असून त्यानिमित्त सुवर्ण पुण्यतिथी समारंभ मोठ्या थाटांत नि संस्मरणीय रीतीनें साजरा करण्यांत येणार आहे हें आतां सर्वांना माहित झालेले आहेच. त्यावेळीं दहा दिवस होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती यापूर्वी करून देण्यांत आलेली आहे.

हा महोत्सव उच्च पातळीवरून साजरा व्हायचा आहे. तदनुसार त्याची पूर्व तयारी चालू आहे. या महोत्सवानिमित्त एक प्रसिद्धी समिती नेमण्यांत आलेली आहे.

त्या समितींत पुढील गृहस्थ सध्यां निवडण्यांत आले आहेत.

ना. व्ही. जी. पागे, ना. बाळासाहेब सावंत, श्री. जी. पी. गोडसे, श्री. पु. ना. कुळकर्णी, श्री. डी. डी. पाटणकर, श्री. रॉय किणीकर वगैरे.

प्रसिद्धी कार्यासाठीं एक खास प्रसिद्धी अधिकारी नेमण्यांत यावा अशी एक सूचना गेल्या महिन्यांत भरलेल्या या समितीपुढें आली असतां महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी अधिकाऱ्याशीं संबंध जोडून ना. पागे यानी योग्य अशा माणसाची निवड करावी असें ठरलें.

सुवर्णमहोत्सव प्रसंगीं एक सुंदर सोव्हेनीर ( स्मरण–पुस्तिका ) प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. त्यांत दहा दिवसांच्या उत्सव कार्यक्रमांचा व जाहिरातींचा समावेश झालेला असेल. त्याचप्रमाणें त्यावेळीं एक सुवर्णमहोत्सव स्मारक ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. भारतांतील व भारताबाहेरील नामवंत तत्त्वज्ञ, विद्वान लेखक यांच्या निवडक लेखांचा समावेश होईल.

श्री साईबाबांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीच्यावेळीं त्यांची तसबीर असलेला पोष्टाचा स्टँप प्रसिद्ध करण्यांत यावा याबद्दल प्रयत्न चालू आहेत.

# संतपुरुष मामा परमानंद

## समर्पित नि प्रार्थनामय जीवन



"महाराजांनीं मजकडे येऊन माझ्या प्रकृतीसंबंधीं समक्ष विचारपूस करण्याची इच्छा प्रदर्शित केली. यांतच माझी सर्व विचारपूस व मानसन्मान झाला. महाराजांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. पण महाराजांनीं येण्याची तसदी मात्र घेऊं नये. मी अगदीं लहान माणूस, माझ्या दाराशीं महाराजांची चार घोड्यांची गाडी उभी राहिलेली पाहून उगाच रस्त्यावर गर्दी व्हायची."

### हे कोण ?

बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव महाराजांना उद्देशून वरील मजकुराचें पत्र ज्यांनीं लिहिलें त्यांचें नांव नारायण महादेव परमानंद. त्यांना सर्वजण 'मामा' किंवा 'मामा परमानंद' या नांवानें संबोधीत. मृत्यूपूर्वी मामा दहा वर्षं

आजारी होते; अंथरुणास खिळून होते; सयाजीरावांची बडोद्याच्या गादीचे वारस म्हणून इ. स. १८७५ त निवड झाली तेव्हां ते अल्पवयी होते. त्यानंतर सहा वर्षांनीं इ. स. १८८१ त भव्य व थाटाचा दरबार भरवून सयाजीरावांना राज्याभिषेक करण्यांत आला, व बडोद्याचे महाराज म्हणून राज्यकारभाराचीं सूत्रें त्यांच्या हातीं देण्यांत आलीं. या तरुण व होतकरू संस्थानाधिपतीच्या कारकीर्दीकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. मामा परमानंदांच्या मनांत या तरुण राज्यकर्त्यांची कारकीर्द प्रजेस सुखावह व त्याला स्वतःला भूषणावह व्हावी असें होतें. म्हणून त्यांनीं महाराजांस उद्देशून एकंदर बारा पत्रें लिहिलीं. हीं पत्रें Letters to an Indian Raja या मथळ्याखालीं व A Political Recluse या सहीनें Indian Spectator या नांवाच्या वृत्तपत्रांत क्रमशः प्रसिद्ध झालीं. या पत्राचा काळ इ. स. १८८९ हा आहे. Indian Spectator मध्यें प्रसिद्ध झालेली पत्रें सयाजीराव महाराज प्रथम कुतुहलानें पुढें उत्कंठेनें व नंतर श्रद्धापूर्वक वाचीत होते. तीं पत्रें त्यांनीं पुनः पुनः वाचलीं. त्यांच्या मनावर त्या पत्रांतील अमृततुल्य उपदेशाचा इष्ट परिणाम होत होता.

**अत्यंत साधी रहाणी**

पत्रांचे लेखक मामा परमानंद यांची भेट घ्यावी असें महाराजांना वाटूं लागलें. त्यांचा मुंबईत मुक्काम असतांना त्यांनीं मामांना निरोप पाठविला, तेव्हां त्यांनीं महाराजांना वर दिलेल्या मजकुराचें उत्तर पाठविलें.

एका बड्या संस्थानिकाचें आमंत्रण नाकारणारे हे मामा तसें पाहिल्यास साधेसुधे गृहस्थ होते, पण 'साधी रहाणी व उच्च जीवितसरणी' या वचनाचा जिवंत आदर्श त्यांच्या चरित्रांत भरून राहिलेला आहे.

त्यांचा जन्म (जुन्या) सावंतवाडी संस्थानांतील माणगांव या नांवाच्या गांवीं जुलै ३, १८३८ रोजीं झाला. विद्याभ्यासासाठीं ते वयाच्या नवव्या वर्षी मुंबईत आपल्या बहिणीकडे आले. त्यांना लहानपणीं नाना म्हणत. मराठी अभ्यासक्रम संपवून जेव्हां नाना एल्फिन्स्टन हायस्कुलांत इंग्रजी शिकण्यासाठीं गेला तेव्हां तेथें भास्कर हरि भागवत, बाळ मंगेश वागळे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, महादेव गोविंद रानडे, वामन आबाजी मोडक हे पुढें समाजकार्यकर्ते व विद्वान् म्हणून नांवलौकिक मिळविणारे सहाध्यायी त्यांना मिळाले. तसेंच, प्रो. ह्यूलिंग्स् सारख्या थोर शिक्षकाच्या मार्गदर्शनाचा त्याला एल्फिन्स्टन महाविद्यालयांत लाभ झाला. नाना दीर्घोद्योगी व हुषार होता, पण आर्थिक परिस्थितीमुळें त्याला बी. ए. पर्यंत शिक्षण पूर्ण करणें शक्य झालें नाहीं. बी. ए. चा नाद सोडून देऊन त्याला इ. स. १८६१ त नोकरीकडे वळावें लागलें. दोनतीन वर्षें शिक्षकाचें काम केल्यानंतर त्यांनीं मुंबईतलि इंदुप्रकाश

नांवाच्या मराठी-इंग्रजी दैनिकाची इंग्रजी संपादकीय कामगिरी स्वीकारली. आठ महिने इंदुप्रकाशच्या कचेरींत काम केल्यानंतर रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं सुरू केलेल्या नेटिव्ह ओपिनियन नांवाच्या पत्राचीं संपादकीय सूत्रें त्यांनीं हातीं घेतलीं. लवकरच त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाची ख्याति सर्वत्र पसरली.

## लोककल्याणाबद्दल कळकळ

संपादकाचें काम करीत असतांना मामा परमानंद त्या वेळच्या लहान-मोठ्या सामाजिक प्रश्नांचें बारकाईनें निरीक्षण करून त्याविषयीं बिनचूक माहिती मिळवीत व नंतर त्या प्रश्नांसंबंधीं निर्भीडपणे, पण सत्य, न्याय, निःपक्षपातीपणा यांना प्रमाण ठेवून लिहीत. तसेंच ज्ञानप्रसारक सभा, स्टुडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीसारख्या संस्थांच्या सभांपुढें ते आमच्या विद्यार्थ्यांच्या गरजा, आमची सामाजिक स्थिति व नीतिमत्ता अशा विषयांवर अभ्यासपूर्वक व विचारपूर्वक लिहिलेले निबंध वाचीत. वाचन, लेखन, निबंधवाचन, व्याख्यानें आणि विशेषतः वृत्तपत्रीय लेखन ही त्या काळांतील लोकजागृतीचीं साधनें होतीं. या सर्वांचा मामांनीं आपल्या ठिकाणीं परिश्रमपूर्वक विकास करून घेतला होता. आपल्या संपादकीय लेखनाच्या द्वारा त्या वेळच्या प्रश्नांचें त्यांनीं केलेलें विवेचन, त्यांची लोकहिताविषयींची कळकळ व लोककल्याण कसें साधावें याबद्दल त्यांनीं वेळोवेळां वृत्तपत्रांतून केलेल्या सूचना वगैरे कच्छ संस्थानांच्या अधिपतींच्या कानांपर्यंत जाऊन पोचलीं व त्यांनीं आग्रह करून मामांना आपल्या संस्थानांत बोलावलें. राजेसाहेबांची व त्यांचे सल्लागार स्वामी आनंदाश्रम या नांवाचे होते, त्यांचीहि इच्छा होती कीं, मामा परमानंदांनीं संस्थानांतील दिवाणाची जागा स्वीकारावी. पण मामांनीं ती जागा न स्वीकारतां तिच्या खालोखाल असलेल्या नायब दिवाणाच्या जागेचा स्वीकार केला. या जागेवर ते फक्त सहा महिनेच राहिले. संस्थानांतील गुंतागुंतीची परिस्थिति व कारभार मामांच्या सत्यप्रियतेला व न्यायी वृत्तीला मानवण्यासारखा नव्हता. त्यांनीं कच्छ सोडून मुंबईस जाण्याचें ठरविलें, त्यावेळीं राजेसाहेबांना दुःख झालें, पण ते मामांचें मन वळवूं शकत नव्हते. "परमानद! तुम्ही चाललां तर!" या शब्दांत त्यांनीं मामांना मोठ्या कष्टानें निरोप दिला. इ. स. १८६८ च्या डिसेंबर महिन्यांत मामा मुंबईस परत आले. मामा राजेसाहेबांची नोकरी सोडून गेले तरी राजेसाहेबांच्या मनांतील त्यांच्याविषयींचा आदरभाव कमी झाला नाहीं. मुंबईस आल्यानंतर मामांनीं राजेसाहेबांकडे सार्वजनिक हिताच्या कामां-साठीं जेव्हां जेव्हां द्रव्यसाहाय्यासाठीं मागणी केली तेव्हां तेव्हां राजेसाहेबांनीं ती उदार हस्ते दिली; इ. स. १८७३ त प्रार्थना समाजानें प्रार्थना—मंदिर बांधण्याचें काम हातीं घेतलें तेव्हां मामांनीं पत्र पाठवून मागणी करतांच राजेसाहेबांनीं लगेच एक हजार रुपये पाठविले व नंतर आणखी साडेसातशें रुपये दिले.

## थोर पुढाऱ्यांशीं संबंध

कच्छ सोडून आल्यानंतर मामांनीं मुंबईत सेक्रेटरिएटमधील ज्युडिशियल खात्यांत सीनियर सुपरिंटेंडेंटच्या जागीं पंधरा वर्षे नोकरी केली. तेथील कामाचा ताण त्यांच्या प्रकृतीवर अतिशय पडला. इ. स. १८८३ च्या ऑक्टोबर महिन्याच्या आठ तारखेला रोजच्या वेळीं कचेरींत जाण्यासाठीं ते आपल्या गिरगांवांतील घरांतून निघाले व चर्नीरोड स्टेशनवर गेले. तेथेंच ते चक्कर येऊन पडले. त्यांना गाडींतून घरीं आणण्यांत आलें. त्यानंतर दहा वर्षे, त्यांनीं जें कांहीं कार्य केलें तें घरच्या घरीं व अंथरुणावर पडलेल्या स्थितींत. हें कार्य अत्यंत मोलाचें होतें. मामांच्या रुग्णशय्येभोंवतीं त्या वेळचे धार्मिक, सामाजिक व राजकीय चळवळींचे पुढारी व कार्यकर्ते जमून हरएक प्रश्नांवर मामांशीं विचारविनिमय करीत. त्यांचा सल्ला घेत. या पुढाऱ्यांत भांडारकर, रानडे, नूलकर, शंकर पांडुरंग पंडित, तेलंग, याज्ञिक, चन्दावरकर, लालशंकर, मलबारी हे होते. ब्रिटिश अधिकारी सर विल्यम वेडरबर्न यांचा व मामांचा जिव्हाळ्याचा स्नेहभाव होता. ते मामांच्या भेटीसाठीं आठवड्यांतून एकदां न चुकतां येत. मामांच्या रुग्णशय्येभोंवतीं जमणाऱ्या कार्यकर्त्यांचें व तेथें घडत असलेल्या वाटाघाटींचें वर्णन बहिरामजी शेट मलबारी यांनीं पुढील शब्दांत केलें आहे.

त्यांच्या शय्येसभोंवतीं दिवसभर त्यांच्या भेटीसाठीं आलेल्या जिव्हाळ्याच्या स्नेह्यांची गर्दी असे. त्यांच्याकडे केव्हांही जा. त्यांच्या शेजारीं कुणी ना कुणी बसलेला दिसे. त्यांच्या त्या अंधाऱ्या खोलीबाहेर जगांत ज्या घडामोडी चालत त्यांसंबंधीं या स्नेह्यांनीं मामांना माहिती सांगावी, त्यांच्याशीं चर्चा करावी, त्यांचे मत विचारावें व तें जें कांहीं सांगत व बोलत व तें सारें अंतःकरणांत सांठवून घेण्यासाठीं एकचित्तानें ऐकावें. हें रोजचें सकाळपासून दिसणारें दृश्य पाहात असतांना मामांबद्दल त्या सर्व स्नेह्यांच्या मनांत किती जिव्हाळा होता व त्यांना प्रेरणा देणारी, त्यांच्यांत आत्मविश्वास जागृत करणारी केवढी शक्ति मामांच्या ठिकाणीं वास करीत होती, याची कल्पना सहज होत असे."

## थांबा ! त्यांना पकडूं नका

मुंबईत साऊटर या नांवाचे बडे पोलीस अधिकारी (कमिशनर) होते. दिवाळींत होणारे आगीचे व इतर अपघात यांना आळा घालण्यासाठीं साऊटरसाहेबांनी एक हुकूम काढून मोठ्या रस्त्यांच्या आसपास फटाके उडविण्याची बंदी केली. आपल्या या हुकुमाची अंमलबजावणी कशी काय होते हें पाहण्यासाठीं एके दिवशीं संध्याकाळीं हे अधिकारी गिरगांव विभागांत कांहीं कॉन्स्टेबल बरोबर घेऊन फिरत होते. फिरतां

फिरतां ते एका घराजवळ थांबले. त्या घरासमोर एक गडी मोठमोठे फटाके उडवीत होता, व घराचे मालक मुलांमाणसांसह फटाक्यांची मौज पहात होते. अर्थात् घर होतें रस्त्याला लागून व फटाके उडत होते, रस्त्याच्या अगदी जवळ. साऊटर साहेबांनीं त्या फटाके उडविणाऱ्या इसमाला पकडण्याचा हुकूम पोलिसांना दिला. ते पुढें होऊन त्याला अटक करणार इतक्यांत मालक पुढें आले व म्हणाले,

"थांबा ! त्याला पकडूं नका ! !"

"कां बरं ?" कमिशनरसाहेबांनीं विचारलें.

"तो फटाके उडवीत होता माझ्या सांगण्यावरून; अपराध त्याचा नाहीं, असलाच तर माझा आहे. पकडायचें असल्यास मला पकडा." मालक म्हणाले.

पोलिसांनीं गड्याला सोडून दिलें व मालकाला पकडून महारबावडी पोलिस स्टेशनवर नेलें. घरच्या मालकांना पकडून नेलें, त्यामुळें घरांत गडबड उडाली. मोठा आकांत झाला !

शंकर पांडुरंग पंडित हे ते गृहस्थ, ज्यांना पोलिसांनीं पकडून पोलिस स्टेशनवर नेलें, आपला नोकर निर्दोष आहे, त्याला पकडूं नका, मला न्या, असें सांगून जे स्वतः पोलिसांच्या स्वाधीन झाले ते. हे नांवाप्रमाणेंच विद्वत्तेच्या बाबतींतहि पंडित होते—फार मोठे पंडित होते. न्यायमूर्ति रानड्यांचे परम मित्र; त्याचप्रमाणें मामा परमानंदांचा व शंकर पांडुरंग पंडितांचा जिव्हाळ्याचा स्नेह होता.

## रा. ब. पंडित

जवळच मामा राहात होते. कुणी तरी लगेच जाऊन मामांना बातमी सांगितली. ती कानांवर पडतांच मामा उठले व रात्रीची वेळ होती तरी धांवतच पोलीस स्टेशनकडे निघाले. शंकररावांना जामिनावर सोडवून आणावयाचें होतें. वाटेंत ना. मोरारजी गोकुळदास शेठचा बंगला होता. त्या वजनदार गृहस्थांच्या मदतीनें मामांनीं शंकररावांना जामिनावर सोडवून घरीं आणलें.

शंकररावांना त्यांच्या घरीं पोहोंचवून मामा आपल्या घरीं आले, तेथें कांहीं माणसें त्यांची वाट पाहात बसलीं होतीं. त्यांच्या शेजारीं रहाणाऱ्या एका गरीब कुटुंबांतील शंकर नांवाच्या मुलास फटाके उडवतांना पोलिस ठाण्यावर नेलें होतें. त्याच्या घरचीं माणसें मामांकडे मदतीसाठीं आलीं होतीं, रडत होतीं. मामा त्याच पावलीं पुनः पोलिस ठाण्यावर गेले व जरूर ती व्यवस्था करून त्या मुलाला—शंकरला घेऊन आले.

शंकरराव पंडित हे एक बडे अधिकारी होते. करारी व बाणेदार गृहस्थ होते. प्रत्यक्ष गुन्हेगार नोकर असतांना मालकाला पकडून नेण्याचा हुकूम साऊटरसाहेबांनी दिला ही गोष्ट कायद्यास व न्यायास धरून झाली नव्हती. पंडितांवरील खटल्याची चौकशी झाली तेव्हां ही गुंतागुंत लक्षांत आली. मग प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें तोड सुचविली. चूक कमिशनर साहेबांच्याकडून व पंडितांकडून घडली आहे. तेव्हां त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित करून परस्परांची क्षमा मागावी. ही क्षमेची तडजोड मान्य झाली, व शंकरराव घरीं आले तेव्हां आपली पत्नी प्रसूत होऊन (दोन पुत्रांनंतर) पहिल्या कन्यारत्नाचा लाभ झाल्याची आनंदाची वार्ता त्यांना समजली. दुहेरी आनंदाच्या भरांत त्यांनीं त्या कन्येचें नांव 'क्षमा' हें ठेवा असें सुचविलें. ही क्षमा पुढें पंडिता क्षमाबाई राव या नांवानें मोठ्या मित्रपरिवाराला व विद्वज्जनांना परिचित झाली.

## कर्तव्यावर आत्यंतिक निष्ठा

प्रार्थनासमाजाची स्थापना ज्या पंधरा सोळा गृहस्थांनीं केली त्यांत नारायण महादेव परमानंद हे होते. प्रार्थनासमाजाचे साप्ताहिक मुखपत्र, सुबोध पत्रिका, त्यांत इंग्रजी बाजूस, आयुष्याच्या अखेरपर्यंत सतत १६ वर्षें न चुकतां मामांचे भारदस्त, सुंदर भाषाशैलीनें युक्त व तळमळ व निष्ठा यांनीं ओतप्रोत भरलेले लेख येत होते. दहा वर्षांच्या आजारांत त्यांची प्रकृति अधिकाधिक क्षीण होत गेली. हवेंतील उष्णतामान किंवा थंडी यांत फरक झाला कीं, ताबडतोब त्याचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम व्हायचा. त्यांच्या आजाराचें निश्चित कारण किंवा स्वरूप शेवटपर्यंत उमगलें नाहीं व म्हणून उपचारांचाही उपयोग होत नसे. अशा शारीरिक दुर्बलतेंत देखील त्यांनीं आपलें लेखन—व त्याच्या द्वारा त्यांनीं चालविलेलें लोकजागृतीचें कार्य—चालू ठेविलें. बिछान्यांत पडल्यापडल्या ते लिहीत, मधून मधून डोळे मिटून घेत—थकवा आल्यामुळें किंवा मनन व विचारांची, शब्दांची, वाक्यांची जुळवाजळव करण्यासाठीं. शक्यतों स्वतः हातानें लिहिण्याचा त्यांचा क्रम होता, पण पुढें हात चालेनासा झाला तेव्हां कष्टानें लेखणी दुसऱ्याच्या हातीं देऊन ते आपण सांगितलेले विचार त्याला लिहावयास सांगत. पुढें पुढें तर आवाजांतहि क्षीणता आली. लिहून घेणारा आपले कान त्यांच्या ओंठाशीं नेऊन प्रयासानें त्यांचे शब्द ऐकून घेई. एकदां अशाचप्रकारें सुबोधपत्रिकेसाठीं लेख लिहिण्याचें काम चाललें होतें. मध्येंच थांबून त्यांचे भाचे श्री. बाबणराव कोरगांवकर त्यांना म्हणाले, "मामा, इतका त्रास करून तुम्ही लेखांची व्यवस्था न केली तर नाहीं का चालायचें ! दुसरें कोणी काम चालवावयास जर नाहीं, तर पुढें जर पत्रिका बंद पडावयाचीच तर ती आतांच बंद केली तर काय होणार आहे !" नाहीं. नाहीं. तसें

नाहीं !" मामा आपल्या क्षीण आवाजांत म्हणाले, "सामर्थ्य आहे तोंपर्यंत आपण काम चालवावें. हें काम चालवावयास कोणी तरी देवाच्या योजनेनुसार पुढें येतील." ही महान् द्रष्टयाची भविष्यवाणी होती. मामांना परलोकीं जाऊन आज (इ. स. १९६७) त्र्याहत्तर वर्षें झालीं; तरी ईश्वराच्या कृपेनें व मामांसारख्या वडिलांच्या आशीर्वादानें सुबोधपत्रिका अजून चालू आहे व वर्षांतील एप्रिल महिन्याचा शेवटचा रविवार (फार जुन्या प्रथाताप्रमाणें) वगळून एकावन्न रविवारीं व न चुकतां वाचकांच्या भेटीस जाते.

इ. १८९३ तील सप्टेंबर महिन्याची तेरा तारीख. हा मामांच्या लोकसेवारत जीवनांतील अखेरचा दिवस होता. आदल्या दिवशीं त्यांनीं मलबारीशेठचा कान आपल्या तोंडाशीं घेऊन नव्या व्हाइसरॉयची कारकीर्द जनतेला सुखावह होण्यासाठीं काय केलें पाहिजे याची रूपरेषा सांगितली. सांगून झाल्यानंतर "आतां माझा अखेरचा रामराम घ्यावा. या शब्दांत त्यांनीं अखेरचा निरोप घेतला. ता. १३ सप्टेंबर रोजीं दोन प्रहरीं दोन वाजतां त्यांची इहलोकीची यात्रा संपली त्यावेळीं त्यांचे परम मित्र व परम शिष्य, रामकृष्णपंत भांडारकर, (डॉ.) शांताराम विठ्ठल, तुकाराम तात्या, भास्कर हरी भागवत, नारायणराव चन्दावरकर, श्रीधरपंत भांडारकर त्यांच्या मृत्युशय्येसभोंवतीं जमले होते.

धर्मनिष्ठा, ईश्वरावरील अढळ श्रद्धा व त्यापासून प्राप्त होणारी चित्ताची शांति यांमुळें मामा परमानंदांच्या ठिकाणीं असामान्य विचार-जागृति, व निर्दोष कार्य-पद्धति याचा विकास झाला होता. बहिरामशेठ मलबारींनी त्यांच्यासंबंधीं लिहिलेल्या-मृत्युलेखांत मामांच्या सर्वजनिक कार्याला उद्देशून म्हटल्याप्रमाणें मामांच्या ठिकाणीं पौरुष पूर्णावस्थेस पोहोंचलें होतें.

मामांचें जीवन म्हणजे खऱ्या अर्थानें समर्पित जीवन होतें. त्यांच्या जीवनांत प्रार्थनेला अत्यंत महत्त्वाचें स्थान होतें. सतत लोकांच्या कल्याणासाठीं झटणें जनतेची इत्प्रकारें सेवा करणें ही त्यांची प्रार्थनाच होती.

आयुष्याचीं अखेरचीं सुमारें दहा वर्षें ते बिछान्यास खिळून होते; तरीही शेवटच्या घटकेपर्यंत त्यांचें सेवाकार्य कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत अखंड चालूच होतें. स्वतःबद्दल स्वतःला होणाऱ्या शारीरिक यातनांबद्दल त्यांनी कधींही कोणाशीं तक्रार केली नाहीं देवानें जी स्थिति दिली त्या स्थितींत समाधान मानून ते राहिले. हा योग साधणें महाकठीण आहे; परंतु तो त्यानीं साधला होता. प्रार्थनेच्या रूपानें त्यानीं देवरायाशीं आपलें संधान जुळविलें होतें.

त्यांचें बालपणापासूनचें विस्तृत व सांगोपांग चरित्र प्रसिद्ध चरित्रलेखक श्री. पु. बा. कुळकर्णी यांनीं लिहून तें 'मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड' या नावानें ( पृष्ठें सुमारें ६०० ) प्रसिद्ध केलें आहे. जिज्ञासूंनीं तें अवश्य वाचावें.



—माझ्या हातून कधींही चूक घडली नाहीं असें वाटून घेण्यांत फारसें महत्त्व नसून चूक घडली तरी तिचा सदुपयोग घडलेल्या चुकीमुळें शहाणे होऊन अधिकाधिक पुढें पाऊल टाकण्यासाठीं करणें यांत महत्त्व आहे. चूक घडली म्हणून वाईट वाटून घ्यायला नको. ती भावी यशाची पायरी ठरावी.

*　　*　　*

—एखाद्या कामाकाजाचा आराखडा मांडून तो अगदीं शंभर टक्के बरोबर आहे, अशा समजुतीनें वागणाऱ्यासाठीं नव्या अडचणी निर्माण होतील; परंतु आरंभापासून शंकामय स्थितींत वावरणारा अंती, सावधगिरीमुळें निःशंकपणें पुढें जाऊं शकतो. सावधगिरीनें वागणें हेंच महत्त्वाचें. मात्र ती फाजील सावधगिरी नसावी.

—रमण महर्षि

# श्रीसद्गुरु साईबाबा यांची शिकवण

लेखक : गं. रा. भट

या भारतवर्षांत अनेक थोर सत्पुरुष व साधुसंत होऊन गेले. त्यापैकीं श्रीसद्गुरु साईबाबा हे एक होते.

बाबांच्या उपलब्ध चरित्राचें अवलोकन केलें तर त्यांत बाबांच्या शिकवणीचें वा उपदेशाचें मर्म श्रद्धा आणि सबूरी या दोन गोष्टींत आहे. हें सहज दिसून येईल. कित्येक प्रसंगीं बाबांनीं या गोष्टीचा आपल्या भक्तांना उपदेश केला आहे. श्रद्धा व सबुरी या गोष्टी पूर्ण आत्मसात केल्यानें माणूस कोणत्याही प्रसंगांतून पार पडूं शकतो वा धैर्यानें तोंड देऊं शकतो. प्रायोपवेशन करणाऱ्या गोखलेबाईला बाबांनीं सांगितलें, 'तूं मजकडे अनन्य पाही। पाहीन तुजकडे तैसाच मीही। माझ्या गुरुनें अन्य कांहीं। शिकविलें नाहींच मजलागीं॥ श्रीसाई सच्चरितम् अध्याय १९/७२ म्हणजे जशी श्रद्धा तसें फळ.

श्रीसाईबाबा हे सामान्य माणसांचे गुरु होते. त्यानीं आपल्या भक्तांचें सदैव कल्याण चिंतिलें. ज्यांच्या हृदयांत बाबा शिरले त्यांतून ते बाहेर आले नाहींत व येणार नाहींत. बाबानीं सर्वांना एकाच मापानें मोजलें. लहान-मोठा हा भेद कधीं केला नाहीं. कुणी कुठल्याही उद्देशानें गेला तरी शेवटीं तो बाबांच्या चरणीं लीन झाला. बाबा सर्वांतर्यामी होते त्यामुळें कुठलीही खोटी गोष्ट त्यांच्यापासून लपून रहात नसे. 'जो जो जें जें वांच्छिल तें तें द्यावें मुघोदया लोकीं' या मोरोपंतांच्या उक्तीप्रमाणें भक्तांचे मनोरथ पूर्ण करून शेवटीं त्यांना परमार्थाचा मार्ग दाखविला. 'आकंठ संकटार्णवीं बुडाला। हो कां महद्दुःखगर्तेत गढला। जो या मशिदमाईची पायरी चढला। सुखा आरूढला तो जाणा॥ फकीर येथीचा मोठा दयाळू। करील व्यथेचें निर्मुळु। प्रेमें करील प्रतिपाळु। तो कनवाळु सकळांचा॥ (अध्याय १३।७२–७४) बाबा आपल्या भक्तांना जो उपदेश करीत त्याप्रमाणें त्यांचें स्वतःचें आचरण होते. भक्तांनीं काय करावें, कसें वागावें याविषयीं बाबांनीं वेळोवेळीं जो उपदेश केला त्याचें सार पुढीलप्रमाणें आहे.

| | अध्याय | ओव्या |
|---|---|---|
| १ पूर्ण श्रद्धा–निष्ठा ठेवणें | १९ | ४४– ७६ |
| सबूरी धरणें–उतावीळ न होणें | १९ | ४४– ७६ |

| | | |
|---|---|---|
| ३ कुणाची निंदा न करणें | १९ | १९८–२०६ |
| ४ कुणाचें मन दुखावेल असें कटु न बोलणें | १ | – ८१ |
| ५ सत्याचरण | | |
| ६ सर्व गोष्टींचें कर्तेकरविते बाबा आहेत अशी दृढ भावना बाळगणें | १९ | २१२–२१९ |
| ७ मी–माझें शरीर व मन केवळ निमित्त आहे | १९ | २१२–२१८ |
| ८ सर्व गोष्टींचा भार बाबांवर सोपविणें व परिणामाचा खेद न करणें | २८ | १९९–२०० |
| ९ नियमित उपासना कुठल्याही तऱ्हेनें वा प्रकारें करावी. | ३ | १०– २० |
| १० भुकेलेल्यास घांस देणें | ९ | ११६–१२२ |
| ११ कुणाचेंहि श्रम फुकट न घेणें | १९ | २३५–२४७ |

सर्व सामान्य माणसास वरील सर्व गोष्टी एकदम आचरणांत आणतां येतील असें नाहीं. हर्ष, खेद व अहंकार या संसारी माणसाच्या नित्याच्या गोष्टी आहेत. पण श्रद्धेचे बळ जसजसें वाढत जाईल तसतसें बाकीचें हळुहळू आपोआप जमत जाईल. कुठल्याही भयंकर संकटीं किंवा आपत्तींत श्रद्धा अविचल राहिली पाहिजे. उलट असें म्हणतां येईल कीं, संकटें हीं श्रद्धेची कसोटी होत.

दुसरी गोष्ट म्हणजे बाबांना तुमच्या सर्व अडचणींची पूर्ण माहिती आहे, त्याबद्दल त्यांच्याकडे एकसारखें मागणें करण्याची मुळींच जरूर नाहीं. मागणें एकच असावें. तें म्हणजे, 'बाबा तुमची आठवण सदैव राहो. मला संभाळून घ्या.' श्रद्धा व सबूरी असेल तर बाबा या गोष्टी जरूर करतात.

माणसाला आपल्या स्वतःच्याच दुःखाचा विचार करण्याची संवय असते. तो दुसऱ्याच्या दुःखांचा कधीं विचारच करीत नाहीं. आपल्या दुःखाइतकें मोठें दुःख कुणाचेंच नाहीं. अशी त्याची भावना असते. आणि मग तो दुःख निवारणाचा मार्ग शोधूं लागतो. कुणाचीतरी भक्ती करणें हा मार्ग त्याला पटकन् दिसतो. पण हा मार्गसुद्धा वाटतो तितका सोपा नसतो भक्ती म्हणजे असें कांहीं आधुनिक इंजक्शन नाहीं कीं तात्काळ त्याचें फळ दिसावें वा परिणाम दिसावा. भक्तीला मोबदल्याची भाषा नाहीं. भक्ती हा आत्मोन्नतीचा मार्ग आहे. संकटें वा आपत्ती यांचा भक्तीवर यत्किंचित परिणाम होऊं न देणें हे खऱ्या भक्तीचें द्योतक आहे. आणि तें माणसाच्या आचरणांत दिसून येते. भक्तीच्या मोबदल्याची जे अपेक्षा करतात किंवा मोबदल्याच्या अपेक्षेनें जे भक्ती करतात त्यांच्यापदरीं पुष्कळदा घोर निराशा येते. त्या भक्तीमध्यें श्रद्धा व

सबूरी यांचा अभाव असतो. इच्छितार्थ प्राप्त होण्यासाठीं भक्ती ही लांच होऊं शकत नाहीं—भक्ती ही लांच असूं नये.

आपण पहातो कीं एखादा विद्यार्थी परीक्षेस बसतो. प्रश्नपत्रिका सोडवतो. त्याच्या दृष्टीनें पेपर फार सोपा असतो. कमींत कमी अमूक मार्क मिळालेच पाहिजेत असेंही सांगतो. पण प्रत्यक्षांत मात्र निरालेंच घडतें. तद्वतच भक्तीचें आहे. कुणाला मनांत असें वाटतें कीं आपण खूप उपासना वा भक्ती केली आहे. पण त्यांतील खऱ्या अर्थानें भक्ती किती व कवाईत किती हें ठरविणारा तो आहे. म्हणून आपण केव्हांही आपल्या भक्तीची मोजदाद करूं नये हें बरें.

सर्वसामान्य माणसाचा उद्धार करणें हें बाबांचे अवतार कार्य होतें. व श्रद्धा आणि सबुरी हें त्यांच्या उपदेशाचें सार होते.

वरील विवेचन फारच त्रोटक व संक्षिप्त आहे. ज्यानीं श्रीसाईसच्चरितम् डोळसपणें वाचलें आहे त्यांना अधिक सविस्तर विवेचन करून सांगण्याची जरूर नाहीं. ज्यानीं तें वाचलें नसेल तें त्यांनीं जरूर वाचावें. व त्याप्रमाणें आचरण करून बाबांची कृपा संपादन करावी.

प्रस्तुत विवेचनाचा लेखक एक सामान्य संसारी माणूस आहे. कुठल्याही नियमानां तो अपवाद नाहीं. व सामान्य माणसाप्रमाणेंच तोसुद्धां अजून कोरडाच राहिला आहे याची त्याला जाणीव आहे.

## दोषांकडे दुर्लक्ष करा !

—दुसऱ्याचे दोष शोधायचे तर प्रथम आपण दोषी बनावें लागतें. दुसऱ्यांच्या दोषांचें तुम्ही चर्वितचर्वण करूं लागला म्हणजे त्याचा त्याला कांहीं फायदा होतो का ! त्यामुळें त्याचें नि त्याबरोबर तुमचेंही मन कलुषित होतें. फायदा तो हाच ! तेव्हां दुसऱ्यांच्या दोषांची उजळणी करण्यांतल्या भरीस पडूं नये हाच शहाणपणाचा मार्ग. दोषांकडे दुर्लक्ष करणें, क्षमाशीलतेनें वागणें हाच आपण अवलंबिला पाहिजे.

—श्री शारदादेवी

# इंद्रजित्-वध

इंद्रजित् आपल्या पित्याचें ( रावणाचें ) सांत्वन करीत होता, " तात, मी जिवंत असतांना तुम्ही कसली विवंचना करतां ? "

सैन्याची जमवाजमव करून तो पुन्हां रणक्षेत्राकडे निघाला.

पुन्हां एकदां वानरसेनेची मनमुराद कत्तल त्यानें करून घेतली. त्याच्यापुढें वानरसेनेचें कांहीं चालेनासेंच झालें. त्यानें सोडलेल्या ब्रह्मास्त्रानें राम–लक्ष्मणांच्या सुद्धां मुसक्या बांधून टाकल्या. त्यांना निश्चेष्ट होऊन भूमीवर पडलेले पाहतांच इंद्रजिताला वाटलें, कीं ते गतप्राण झाले. ती वार्ता रावणाच्या कानांवर घालण्यासाठीं तो तसाच अधीरतेनें दुर्गांत परत आला.

बिभीषणानें पुन्हा वानरसेना कशीबशी एकत्र केली आणि त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

तेवढ्यांत जांबवानानें विचारलें, " हनुमान कुठें आहे ? "

" हा मी इथें आहे," हनुमान पुढें येऊन म्हणाला.

" पुत्रा, असाच उत्तरेकडे हिमालय पर्वतावर जा. तेथें ऋषभ नि कैलास या पर्वतांच्यामध्यें असलेल्या शिखरावर चार प्रकारच्या औषधी आहेत, त्या घेऊन ये. त्या सत्वर आणल्यास तरच राम–लक्ष्मण आणि निश्चेष्ट होऊन पडलेले आपले इतर सैनिक पुन्हा उठून उभे राहूं शकतील. जा, क्षणाचाहि विलंब लावूं नकोस. तुझ्या-खेरीज दुसऱ्या कुणाच्याहि हातून हें काम होणार नाहीं."

हनुमान उड्डाण करून हिमालय पर्वतावर आला. जांबवानानें सांगितलेल्या औषधींचा त्यानें कसून शोध केला. पण त्या कांहीं त्याला सांपडल्या नाहींत. मग त्यानें तो डोंगरच पायथ्यापासून उपटला आणि तो घेऊन तो दक्षिणेकडे आला.

संजीवनी औषधींसह तो डोंगर लंकेंत येऊन टेपतांक्षणींच राम–लक्ष्मण आणि इतर वानरसैनिक शुद्धीवर आले. क्षणार्धांत त्यांच्या जखमा बऱ्या झाल्या आणि पूर्ववत् धडधाकट होऊन ते उभे राहिले.

पुन्हां युद्धास प्रारंभ झाला. रामाच्या आदेशानुसार सुग्रीवानें कांहीं वानरांना दुर्गांत प्रवेश करून उभ्या लंकेला आग लावावयास सांगितलें.

मध्यरात्रीच्या सुमारास त्या वानरांनीं हातांत पेटत्या मशाली घेऊन दुर्गांत प्रवेश केला आणि जिकडे तिकडे आगी लावावयास सुरुवात केली.

वाल्मीकींनीं या प्रसंगाचे वर्णन इतकें तपशलिवार केलें आहे, कीं तें वाचून आधुनिक युद्धांत होणाऱ्या विध्वंसाची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं.

लंका पेटल्याचें पाहातांच रावणाचा क्रोध गगणांत मावेनासा झाला. कुंभकर्णाचे पुत्र कुंभ व निकुंभ, यूपाक्ष आणि इतर अनेक राक्षसयोद्धे ह्यांना त्यानें वानरसेनेवर जोरानें हल्ला चढविण्याचा आदेश दिला.

पुन्हा घनघोर युद्ध झालें. कुंभ, निकुंभ, मकराक्ष यांबरोबरच इतरहि सहस्रावधि राक्षसयोद्धे धारातीर्थी पडले. रावणाच्या आदेशानुसार इंद्रजित् पुन्हा चालून आला. त्यानें आकाशांत उड्डाण करतांक्षणींच तो अजिंक्य झाला. तो अदृश्य झाल्यामुळें वानरसेनेला कोठेंच दिसेना! आपल्या मायाशक्तीनें त्यानें वानरसेनेपुढें असें चित्र उभें केलें, कीं सीता रथांत बसून रणभूमीवर आली आहे आणि सर्वांच्या डोळ्यां-देखतच आपण तिचा वध करीत आहोंत.

वानर या प्रकारानें फसले आणि हताश होऊन म्हणूं लागले, "आतां सीतामाई गेल्यावर युद्ध तरी कशासाठीं करायचं?" रणभूमि सोडून ते दुःखित होत्साते रामाकडे आले.

मधल्या काळांत इंद्रजितानें आसुरी यज्ञ केला. वानरसेनेनें दिलेला वृत्तान्त ऐकून राम-लक्ष्मणांनाहि वाटूं लागलें, कीं खरोखरच इंद्रजितानें सीतेला मारून टाकली आहे. तेहि अगदीं गलितगात्र होऊन बसले. तेवढ्यांत बिभीषण तेथें आला.

सर्व वृत्तान्त ऐकल्यावर तो म्हणाला,

"तुम्ही फसत आहांत. रावण कालत्रयीं सीतेचा वध करूं देणार नाहीं. इंद्रजितानें टाकलेलं हें मायाजाल आहे. आपले सगळे उपाय हरले आहेत हें पाहून तो आसुरी यज्ञ करण्याच्या उद्देशानें निघून गेला आहे. या यज्ञाची सांगता जर तो करूं शकला तर मात्र त्याच्यावर आपणास विजय मिळवितां येणार नाहीं. कांहींहि करून आपण या यज्ञाला मोडता घालायला हवा. लक्ष्मणाला या कामासाठीं पाठवावा."

हनुमानास व बिभीषणास बरोबर घेऊन लक्ष्मण निघाला आणि क्षणार्धांत ते सारे इंद्रजित यज्ञ करीत होता तेथें येऊन थडकले. पुन्हा तुंबळ युद्ध झालें. इंद्रजित रथारूढ होऊन लक्ष्मणावर शरवर्षाव करूं लागला, तर लक्ष्मण हनुमानाच्या खांद्यावर आरूढ होऊन इंद्रजितावर बाण सोडूं लागला. दोघेहि तुल्यबल असल्यामुळें हें युद्ध

प्रदीर्घ कालपर्यंत चाललें. तेवढ्यांत इंद्रजिताचा रथ खिळखिळा झाला, म्हणून तो जमिनीवर उभा राहून लढूं लागला. तेव्हां लक्ष्मणहि हनुमानाच्या खांद्यावरून खालीं उतरला.

अखेर रामनामाचा जप करून लक्ष्मणानें इंद्रजितावर इंद्रास्त्र सोडलें आणि इंद्रजिताचें शिर धडापासून वेगळें करून टाकलें. तें शिर खालीं कोसळलें तेव्हां आकाशाचा रोळच्या रोळ खालीं आल्यासारखें वाटलें. देव-गंधर्वांनीं स्वर्गांतूनच पुष्पवृष्टि केली.

लक्ष्मण रामाकडे आला. त्याच्या शरिरावरहि अनेक जखमा झाल्या होत्या. जांबवान् व हनुमान यांच्या खांद्यांचा आधार घेतल्याशिवाय त्याला चालतांहि येत नव्हतें. इंद्रजिताच्या वधाची वार्ता रामाला आधींच समजली होती.

लक्ष्मणाला उद्देशून तो म्हणाला, "राक्षसकुळाचा अंत झाला असंच म्हटलं पाहिजे."

लक्ष्मण विनतमस्तक असा रामासमोर उभा होता.

"लक्ष्मणा, रावणाचा उजवा हातच जणूं तूं तोडून टाकला आहेस. बिभीषण काय, तूं काय किंवा हनुमान काय, कोण तुमची बरोबरी करूं शकणार आहे? आतां मला कसलीहि विवंचना नाहीं. इंद्राला जिंकणाऱ्या इंद्रिजिताचा तूं वध केला आहेस. आतां सीतेची मुक्तता जवळ जवळ झाल्यासारखीच आहे!"

इंद्रजिताच्या मृत्यूची वार्ता रावणाच्या कानीं आली. बिभीषणानें लक्ष्मणाला साहाय्य केल्यामुळेंच तो इंद्रजिताचा वध करूं शकला, हें जेव्हां त्याला कळलें तेव्हां मात्र त्याच्या क्रोधाला व शोकाला पारावार राहिला नाहीं. त्याच्या डोळ्यांतून नि मुखांतून अग्निज्वाला निघूं लागल्या. पुत्रशोकानें तो अगदीं विव्हळ होऊन गेला.

त्या संतापाच्या भरांत सीतेचा वध करण्याची कल्पना त्याच्या मनांत आली. खड्ग घेऊन तो बाहेरहि पडला.

पण तेवढ्यांत सुपार्श्व नांवाच्या एका मंत्र्यानें त्याला रोखून धरलें नि म्हटलें, "राजन्! एका अबलेवर आपण हें खड्ग चालवणार? हें पापकर्म आपल्या हातून कदापि घडतां कामा नये. क्रोधाला बळी पडाल तर सर्वनाशाच्या गर्तेत जाऊन कोसळाल. वेदविद्या ज्याच्या जिभेवर आहे, अनेक यज्ञयाग नि तपश्चर्या ज्यानें केल्या आहेत, असा तुमच्यासारखा पुरुष हें पाप कसा करूं धजेल? आपणांला क्रोधच व्यक्त करायचा असेल तर तो रामावर करा. उद्यां प्रतिपदा आहे. सारं बळ एकवटून

रामावर चालून जा नि त्याचा वध करा. मग सीता आपलीच आहे. चला, ब्रह्मदेवानें दिलेलं चिलखत अंगावर चढवा, रथारूढ व्हा नि रणभूमीवर निघा.”

सुपार्श्वाचा हा उपदेश रावणाला रुचला. थोडा वेळ तसाच सिंहासनावर बसून तो विचार करीत राहिला. मग आपल्या सेनापतींना जवळ बोलावून तो म्हणाला, “जा, नि रामावर प्राणपणानें तुटून पडा. तुम्हांला जर यश आलं नाहीं तर मी आहेंच पाठोपाठ तुमच्या.”

एवढ्या विनम्रपणानें तो यापूर्वी कुणाशींच कधीं बोलला नसेल. आपत्कालानें त्याला ही शिकवण दिली होती.

रावणाचें प्रचंड सैन्य पुन्हां रामावर चालून गेलें. पण प्रयत्नांची शिकस्त करूनहि विजयाचे नखहि त्यांच्या दृष्टिपथांत येऊं शकलें नाहीं. राक्षससेनेचा पूर्ण निःपात होऊन गेला. रणभूमीवर पाहावें तिकडे गतप्राण होऊन पडलेल्या राक्षसांचीं प्रचंड धुडें अस्ताव्यस्तपणें पसरलेली दिसत होती. देव, गंधर्व आनंदित होऊन वानरसेनेवर आकाशांतून पुष्पवृष्टि करीत होते. लंकानगरींत राक्षसस्त्रियांचा आक्रोश चालला होता. रावणाच्या नांवानें बोटें मोडीत त्या मोठमोठ्यानें विलाप करीत होत्या.

रक्ताच्या थारोळ्यांनीं सारें धारातीर्थ भरून गेलें होतें.



—कठोर शब्दांनीं दुसऱ्याचें मन दुखविणें हें अत्यंत वाईट. तो मार्ग सज्जनांचा नाहीं. फार काय ? एखादा पांगळा माणूस दिसला तर तूं पांगळा कसा झालास ? असा प्रश्न त्याला विचारूं नये. त्यामुळें तो दुःखी—कष्टी होतो.

—श्री शारदादेवी

# थोरामोठ्यांच्या छोटया गोष्टी

## १ : देवीनें महामंत्र दिला

शबल नांवाचा विद्यार्थी होता. त्याला वाटे की लहानपणी कृष्ण कुठे अभ्यास करी ! अभ्यास करण्यापेक्षा आपण देवीला प्रसन्न करून घ्यावे. त्याने सरस्वतीदेवीची प्रार्थना केली. कर्मधर्मसंयोगाने देवी प्रसन्न झाली. प्रकट झाली. शबल म्हणाला, "देवी, मला परीक्षेत यश मिळविण्यासाठीं मदत कर. मला अभ्यासाचा कंटाळा येतो." देवी म्हणाली, "मी तुझी सर्व कामे करते. तूं स्वस्थ झोप." शबल खूष झाला.

थोड्या वेळानें शबलला भूक लागली. तो उठला, पण त्याची मिठाई देवीनें हातांत घेतली. ती म्हणाली, "सर्व मीच करणार आहे ना ? मिठाई मीच खातें. कृष्ण लहानपणी सांदिपनींच्या आश्रमांत अभ्यास करीत असे. तो दूधतूप खाई, त्या आधीं व्यायाम करून घाम गाळीत असे.

शबल बावरला. त्याला काय बोलावें ते सुचेना. त्याला चूक समजली. देवी थोडी हंसून म्हणाली, "मी मिठाई खाऊन जसे तुझे पोट भरणार नाहीं, तसे मी मेहनत करून तुला खरें सुख लाभणार नाहीं. यासाठीं माझें स्मरण करून अभ्यासाला लाग. मिठाई खातांना जसा तुला रस वाटतो, गोडी वाटते, तशी तूं अभ्यासांत घे." त्यानंतर तो प्रार्थना करून, मन शांत करून अभ्यासाला बसूं लागला. मोठमोठ्या परीक्षा दिल्या. विद्वान झाला. देवीनें दिलेला सुखाचा मूलमंत्र तो विसरला नाहीं.

## २ : बुद्ध आणि तेल

बुद्ध गांवोगांव फिरत होते. एका गांवी एक बाई त्यांची कीर्ति ऐकून त्यांच्याकडे गेली आणि रडत म्हणाली, "माझा मुलगा सकाळीच मेला. त्याला जिवंत करा."

बुद्ध म्हणाले, "पाहतो. गांवांतून थोडे तेल घेऊन या, पण त्या घरी कोणी मेलेले नसले पाहिजे."

बाई मोठ्या आशेनें निघाली. दारोदार हिंडू लागली. पण जो तो डोळ्यांत पाणी आणून, आपल्या घरीं कोण कोण मेले त्याची आठवण काढून रडूं लागला. मग तिथले तेल कसे चालणार ?

बाई समजली. जगांत दुःख भरलेले आहे. शहाण्यामाणसानें त्याबद्दल तक्रार न करतां त्याची सवय केली पाहिजे. पुढें दुःख नको तर आतां थोडे घेतले पाहिजे.

बुद्धाकडे ती वृद्धा परत आली. तिनें लवून नमस्कार केला. तिचे समाधान झाले होते.

**३ : मोठे लहान होते तेव्हा—**

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रामन यांच्या लहानपणाची ही गोष्ट आहे. लहानपणी ते चंचल होते. त्यांच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होत होता.

डॉ. रामनच्या वडिलांनी एक दिवस त्यांना जवळ बोलावले आणि वृत्तपत्राच्या अंकावर दुर्बिण फिरवीत ते म्हणाले, “ आता तुला काय दिसतं ? ”

“ अक्षरं मोठी दिसतात. ”

वडिलांनी दुर्बिण एकेजागी स्थिर केली. वरून उन्हाचे किरण पडत होते. स्थिर दुर्बिणीच्या ते आरपार गेले आणि जेथे ते एकत्र झाले तेथे कागद जळू लागला.

“ कशी जादू आहे ! ” वडील म्हणाले.

डॉ. रामन चकित मुद्रेने पाहत राहिले.

वडील म्हणाले, “ मुला, हा एकाग्रतेचा परिणाम होय. ”

या प्रयोगाचा रामनवर विलक्षण परिणाम झाला. चंचलता सुटली. एकाग्रता आणि अभ्यास यांच्या संगतीनें त्यांनी उच्चपद जिंकले.

**४ : महावीराची गोष्ट**

एकही लढाई न खेळता ज्यांनी ‘ महावीर ’ पदवी मिळविली अशी वर्धमान ही एकच विभूती असेल. पण त्यांनी स्वतःच्या कुवासना जिंकल्या, म्हणून ते जैन महावीर ठरले. मुलांनो, कोणतेही मोठे नाव आठवा, त्याने कष्ट सोसलेले असतात, म्हणूनच ते मोठे होतात.

महावीर ५ वर्षांचे होते. खेळत होते. कोणीतरी ओरडले, “ साप, साप. ” सवंगडी पळाले. पण महावीरांनी साप हातात धरून दूर सोडला. असाच एकदा वैशाली नगरात एक हत्ती मोकाट सुटला. लोक सैरावैरा पळत सुटले. पण महावीरांनी हत्तीला शांत केले.

बारा वर्षे त्यांनी तप केले. त्यासाठी राज्य द सोडले. सतत फिरत होते. उपवास, कष्ट, मारहाण याला भिऊन त्यांनी शांती सोडली नाही. एका राजपुत्राने मोह सोडून जो उद्धार करून घेतला; त्याने हजारो, लाखो लोकांना स्फूर्ती मिळाली. मिळत राहील.

# भाव तैसें फळ

—संत विनोबा

भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥ १ ॥
धांवे जातीपाशीं जाती । खूण येरयेरां चित्तीं ॥ २ ॥
हिरा हिरकणी । काढी आंतूनि ऐरणी ॥ ३ ॥
तुका म्हणे केलें । मन शुद्ध हें चांगलें ॥ ४ ॥

जसा आपला भाव तसें फळ आपल्याला देव देतो. देवापाशीं बळ चालत नाहीं. ज्या जातीचा 'मी' त्याच जातीचा 'तो' मला भेटतो, ह्याची खूण त्यालाहि पटते आणि मलाहि पटते. हिरा–हिरकणीचा दाखला लोक देतात त्याचा हाच अर्थ आहे. हिऱ्याची पारख करण्यासाठीं त्याला ऐरणीवर ठेवून घणांनीं मारतात, पण तो खरा हिरा असल्यास न फुटतां ऐरणींत घुसून बसतो. त्याला बाहेर काढण्यासाठीं हिरकणी त्याच्याजवळ नेतात. म्हणजे तिच्या आकर्षणानें तो बाहेर निघतो. ती त्याला कां बाहेर खेंचूं शकते ? कारण ती त्याच्याच जातीची असते तसें माझें 'स्वरूप' ज्या जातीचें त्या जातीचें 'विश्वरूप' मी खेंचून घेतो. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, आपण आपलें मन पुनः पुनः तपासून शुद्ध करीत असावें हें चांगलें.

ह्या अभंगांत सांगितलेला देवाचा कायदा

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्**

ह्या गीतेंतील वचनावरून घेतला आहे. पण तो कायदा लागू कसा करावयाचा हें ह्यांत विशेष सांगितलें आहे.

माझा देव किंवा माझ्या आसपासची दुनिया हें माझ्या मनाचेंच प्रतिबिंब आहे म्हणून—

(१) हें प्रतिबिंब जसें असावें असें मी इच्छितों तसें माझें बिंब मला राखलें पाहिजे. लोकांनीं माझ्याशीं प्रेमानें वागावें अशीच स्वाभाविकपणें माझी इच्छा असणारच. म्हणून मला माझें मन प्रेमळ राखलें पाहिजे. आणि—

(२) हें प्रतिबिंब जर वाईट पडलें असेल तर तो वाईटपणा मला माझ्या बिंबांत पाहिला पाहिजे. म्हणजे दुसरा जर माझ्याशीं दुर्जनपणानें वागत असेल तर माझ्या मनांत ह्या दुर्जनपणाचें बीज मीं तपासलें पाहिजे. आणि तपासून माझें मन मीं शुद्ध केलें पाहिजे.

ही आत्मपरीक्षणाची वृत्ति तुकाराम महाराजांच्या अंगीं संपूर्ण बाणलेली होती. खालील गोष्टींत तिचें सुंदर दर्शन होतें.

महाराजांनीं आपल्या वांट्याचीं खतपत्रें इंद्रायणींत बुडविलीं तेव्हांपासून ते मजुरी करून राहूं लागले. मोडकेंसें खोपट आणि त्यांत चार दोन मडकीं हा मुख्य संग्रह. कण्या रांधाव्या आणि दाट-पातळ कसातरी काळ सारावा. पण ह्या आदर्श गरिबीला एकच गालबोट लागलें होतें. महाराजांचें सासरे आप्पाजी गुळवे सावकार यांनीं आपल्या लेकीला एक दुभती म्हैस दिली होती. महाराज तिचें दूध तिच्या वासराला पोटभर पाजीत आणि उरलेले थोडें घरांत वापरीत असत. एकदां नित्याप्रमाणें महाराज रात्रीं देवळांत करीत असतां घरांत चोर आले आणि त्यांनीं तेवढी म्हैस पळवली. गांवाच्या बाहेर बरेंच दूर गेल्यानंतर त्या चोराच्या हृदयांतल्या देवानें विक्राळ रूप धारण केलें, आणि एक भला मोठा टोणपा हातांत घेऊन तो त्यांना मारूं लागला. चोर घाबरून गयावया करूं लागले. पण तो कांहीं सोडीच ना. तेव्हां त्यांनीं परत जाऊन ती म्हैस झोपडींत जेथल्या तेथें बांधली, आणि तेथून ते आल्या वाटेनें पळत सुटले. पण त्या अंतर्यामी देवानें त्यांचा पिच्छा सोडला नाहीं. तो म्हणाला " तुम्हांला अनुताप झाला एवढें बस नाहीं. गुन्हा जाहीर झाला पाहिजे. तुम्ही देवळां जा, आणि महाराजांना सर्व सांगून त्यांची माफी मागा." देवाचा शब्द ऐकून ते भीत भीत देवळांत आले. इकडे 'ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं' हा रंग माजला होता. कीर्तन संपेपर्यंत ते तेथेंच बसले. शेवटीं सगळी हकीकत महाराजांना जशीच्या तशी सांगून टाकली. महाराजांनी "तुम्हांला गरज असेल तर ती म्हैस तुम्ही अवश्य घेऊन जा. ती म्हैस आजपर्यंत मीं माझी मानलेलीच नाहीं," वगैरे पुष्कळ सांगून पाहिलें. पण त्यांनीं तें कबूल केलें नाहीं. पुढें महाराज घरीं आले. "चोर माझ्याकडे कां आले? मागून त्यांना पश्चात्ताप वाटला हें ठीक आहे. पण त्यांना माझ्या घरीं चोरी करण्याची मूळ प्रेरणाच कशी झाली? 'धांवे जातीपाशीं जाती' मी चोर असल्याशिवाय माझ्याकडे चोर येणें शक्य नाहीं" असें त्यांनीं पुष्कळ आत्ममंथन केलें. आणि दुसऱ्या दिवसापासून त्या म्हशीचें दूध घरीं न वापरतां गांवांतल्या कोणातरी गरिबाच्या मुलाला द्यावें असा रिवाज सुरू झाला.

---

# भगवंताशीं आमचें नातें

***************************

धर्मविषयाचा सांगोपांग विचार करणाऱ्या एका विद्वान इंग्रज लेखकानें मनुष्याच्या ऐहिक जीवनाला समुद्रकांठच्या डबक्याची उपमा दिली आहे. ह्या डबक्यांत समुद्राचें पाणी यावयाला जमिनीखालून मार्ग आहे. समुद्राला भरती आली म्हणजे ह्या मार्गानें पाणी आंत येऊन डबकें भरून जातें व ओहोटी लागली म्हणजे पाणी परत जाऊन डबकें रिकामें होतें. पाणी आंत येण्याचा मार्ग जर बुजून जाईल तर डबक्यांत शिल्लक राहिलेलें पाणी नासून जाईल व सूर्याच्या उष्णतेनें त्याची वाफ होऊन शेवटीं डबकें अगदीं खडखडीत होईल. म्हणजे त्याचें अस्तित्व नाहींसें होईल. ह्याच्या उलट पाणी येण्याचा क्रम जर चालू राहील, तर मार्ग रुंदावत जाऊन कालांतरानें डबकें व समुद्र एकजी होऊन जातील. ही उपमा अगदीं सार्थ आहे. थोडक्यांत तिचा सारांश असा आहे कीं, आमचें जीवन पूर्णपणें परमेश्वरावर अवलंबून आहे. परमेश्वराचा व आपला एकसारखा समागम होत राहिला, तर आपलें जीवन परमेश्वरमय झाल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु असें होण्याला आमचा परमेश्वरावर, त्याच्या गुणांवर, चांगुलपणावर व प्रेमस्वरूपावर दृढ विश्वास असला पाहिजे. हल्लींचा काळ ह्या विश्वासाला पोषक नाहीं. जिकडे तिकडे 'बळी तो कान पिळी' ह्या तत्त्वाचा विजय होत असलेला आपण पहात आहों. मनुष्यांचा व राष्ट्रांचा सर्व उत्साह व सामर्थ्य दुसऱ्याची मालमत्ता गिळंकृत करण्यामध्यें खर्च होत आहे. बुद्धी, ज्ञान कला कौशल्य, शोध इत्यादिकांचा दुसऱ्याचा नाश किती बेमालूमपणें व लवकर करतां येईल ह्यांचा विचार करण्याकडे उपयोग होत आहे. ईश्वर हा अन्याय चालू देतो आहे; ह्या जगांत न्याय नाहीं; सत्याला जय नाहीं असा अनुभव येतो आहे. तेव्हां परमेश्वरावरची आमची निष्ठा कायम राहून वाढावी कशी ! शिवाय आमच्या शाळांमध्यें व कॉलेजांमध्यें धर्मशिक्षणाचा अभाव असल्यामुळें अज्ञेयवाद्यांचा व निरीश्वरवाद्यांचा भरणा युनिव्हर्सिटीमधून दर वर्षी बाहेर पडत आहे. एकंदरीनें एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें चाळीस वर्षांपूर्वीच्या अज्ञेयवादाची लाट पुन्हां उसळूं पहात आहे. ह्या आणीबाणीच्या वेळीं ज्यांचा परमेश्वरावर विश्वास आहे त्यांनीं तो सुदृढ होण्यासाठीं परमेश्वराचें व आपलें पितापुत्राचें कसें नातें आहे व त्याच्या प्रेमस्वरुपाचा आपल्याला एकसारखा कसा अनुभव घ्यावयास मिळतो ह्याची जागृति करणें अस्थानीं होणार नाहीं.

वेगवेगळ्या धर्मांत जगाच्या उत्पत्तीच्या वेगवेगळ्या कल्पना नमूद केलेल्या आहेत. ख्रिस्ती धर्माच्या जुन्या करारांत पृथ्वीच्या उत्पत्तीचें जें वर्णन आहे त्याप्रमाणें पाहिलें असतां, ईश्वरानें पाणी उत्पन्न केलें; नंतर जमीन केली; मग पाण्यांतलें प्राणी केले व त्यानंतर जमिनीवरचीं झाडें, पशु, पक्षी इत्यादि केले व शेवटीं पृथ्वीवरील माती घेऊन तींत फुंकर घालून स्वतःच्या प्राणांनीं युक्त असा मनुष्यप्राणी बनविला. हिंदुधर्मांतील कल्पना अशी आहे की सत्याचें पालन करणारा ब्रह्मा, ह्यानें पृथ्वी उत्पन्न केली; विष्णु करितो व सर्वांचा संहार करणारा शंकर तिचा लय करील. शास्त्रज्ञांच्या मतें सूर्यावर एका काळीं प्रचंड स्फोट होऊन त्याचा एक तुकडा उसळून त्याच्यापासून निसटला, परंतु तो गुरुत्वाकर्षणाच्या तडाक्यांत मिळाल्यामुळें तो सूर्याभोंवार फिरूं लागला. कोणतीहि कल्पना घेतली तरी तिच्या मुळाशीं ईश्वरच आहे, हें आपल्याला सहज दिसून येणार आहे. आमच्या इकडील अवतारांची कल्पना जुन्या करारांतील पृथ्वीच्या उत्पत्तीच्या हकिकतीशीं ताडून पाहिली असतां उत्क्रांतितत्त्व खरें असल्याचें आपल्याला दिसून येईल. पहिला अवतार मत्स्याचा झाला; दुसरा अवतार कांसवाचा झाला. ह्याचा अर्थ जमिनीवर व पाण्यांत रहाणारा प्राणी उत्पन्न झाला. कांसवाची उत्क्रांति होऊन वराह म्हणजे केवळ जमिनीवर रहाणारा प्राणी झाला; पुढें नारसिंह, म्हणजे धड मनुष्य नाहीं व धड पशु नाहीं असा प्राणी उत्पन्न झाला. ह्यापुढें वामन अवतार म्हणजे पूर्ण वाढ न झालेला, अशीं मनुष्य झालीं. ह्याप्रमाणें जगांतील प्राण्यांच्या उत्पत्तीचा इतिहास आहे. केवळ क्षुद्र प्राण्यांची उत्क्रांति होत होत जर मनुष्यजात बनली असेल, तर आमची पशुपक्ष्यांविषयींची जबाबदारी फार मोठी आहे, हें सहज दिसून येण्यासारखें आहे. त्यांना क्रूरपणें न वागवितां प्रेमानें वागविणें हें आपलें कर्तव्य आहे. परमेश्वरानें मनुष्यप्राण्याला आपल्या गुणांनीं संपन्न असा बनविला आहे. त्यानें आम्हांला मन, बुद्धि, इंद्रियें दिलीं आहेत व त्यांचा उपयोग करण्याला स्वातंत्र्य दिलें आहे. असें आहे तरी तें स्वातंत्र्य पूर्ण नाहीं. आम्ही परमेश्वरावर प्रत्येक गोष्टींत अवलंबून आहों. आरंभीं सांगितल्याप्रमाणें त्याचा आमचा समागम होईल तरच आमचें जीवित कायम राहील, नाहींतर आम्ही मृत होऊं. परमेश्वरानें आम्हांला उत्पन्न केलें व तो आमची उत्पत्ति व्हावी म्हणून सतत काळजी वाहतो, म्हणून त्याचें व आमचें नातें पितापुत्राचें आहे हें अगदीं स्पष्ट आहे. वरवर विचार करणारांना हें नातें स्पष्टपणें समजणार नाहीं. परमेश्वराच्या निर्दय व अन्यायाच्या भासणाऱ्या कृतींचा त्यांना उलगडा होणार नाहीं. परमेश्वर जर आपला पिता आहे व तो जर प्रेमस्वरूपी आहे तर मग आम्हांवर संकटें कां येतात, असत्याचा जय कां होतो ? अकालीं मृत्यु येणें, प्लेगसारख्या, भूकंपासारख्या किंवा युद्धांसारख्या आपत्ति कां येतात ? त्या येतात एवढ्यावरूनच तो प्रेमस्वरूपी नाहीं असेंहि वाटण्याचा संभव आहे. पण त्याचा खोलवर

करणाऱ्या साधुसंतांचा अनुभव निराळाच आहे, व ह्या अनुभवासंबंधानें सर्वांचें एकमत आहे. साधुसंत आमचे आध्यात्मिकदृष्ट्या वडील बंधु असल्यामुळें त्यांचा अनुभव खरा मानण्यास हरकत नाहीं. व विचारांतीं आम्हालाहि तसाच अनुभव येतो. तुकारामबुवा परमेश्वराला मातापितरांची उपमा देतात. पण तीहि सार्थ नाहीं असें वाटून ते त्याला जिवलग मित्र असें म्हणतात. सेंट पॉल म्हणतो कीं, राज्याचीं राज्यें उलथून पडलीं किंवा कोणीं कितीहि प्रयत्न केले तरी परमेश्वराच्या प्रेमापासून आम्हांला दूर करण्याला कोणीहि समर्थ नाहीं! धन्य हे साधु! धन्य त्यांचा विश्वास व धन्य त्यांचा अनुभव. असा अनुभव आम्हांला केव्हां येईल बरें! वरील सर्व विवेचनावरून इतकें स्पष्ट होतें कीं परमेश्वर ह्या जगाचा उत्पन्नकर्ता, त्याचें पालन करणारा व आमचें प्रेमानें रक्षण करणारा करुणामय पिता आहे व त्यावर अपत्यभावानें प्रेम करणें हें आमचें कर्तव्य आहे.

पण ह्या थोर भाग्याची आमच्या ठिकाणीं जागृति कोठें आहे? आम्ही आपलें रडगाणें गातच असतों कीं मी काय यःकश्चित व्यक्ति आहें, मी पतित आहे; मी अधम आहे. माझ्या हातून काय होणार आहे! ह्या रडण्यामुळेंच आमची इतकी अवनत स्थिति होऊन राहिली आहे. आत्मविश्वास नष्ट झाल्यामुळें, आपलें व परमेश्वराचें नातें विसरलें गेल्यामुळें आम्हीं आपला घात करून घेतला आहे. आम्हांला व्यक्तिचें महत्व समजत नाहींसें झालें आहे. हा काळ बहुमतानें गोष्टी करण्याचा आहे. दारूचा व्यापार बंद करणें, प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करणें. गुलामांचा व्यापार बंद करणें ह्या गोष्टी तत्त्व ह्या दृष्टीनें रास्त आहेत हें कोणीहि कबूल करील; पण ह्या चांगल्या व आवश्यक गोष्टी करणें मात्र बहुमत असल्याशिवाय शक्य नाहीं! बहुजन समाजाचाच काय तो जोर व महत्व, व्यक्तीचें कांहींच नाहीं. पण अशा प्रकारची स्थिति असतां प्रथमतः कोणतीही कल्पना व्यक्तीच्याच डोक्यांतून निघते हें आम्ही कां विसरतों बरें? जगांत ज्या मोठमोठ्या सुधारणा घडून आल्या आहेत व ज्यांचीं सुखदायक फळें आम्ही भोगीत आहों, त्या व्यक्तीच्याच कल्पनांचीं फळें नव्हत काय? सॉक्रेटीस, बुद्ध, तुकाराम, लुथर व ख्रिस्त ह्या व्यक्ती जर आमच्या हातून काय होणार आहे असे उद्गार काढून व हें रडगाणें गाऊन कार्य करण्याचें टाकून स्वस्थ बसल्या असत्या तर जगाची नैतिक व धार्मिक स्थिति कोणत्या प्रकारची असती बरें? कॅक्स्टन, मार्कोनी, एडिसन इत्यादि व्यक्ति आपण काय करणार, आम्ही यःकश्चित् मर्त्य प्राणी आहों असें म्हणून कर्तव्यपराङ्मुख झाले असते तर त्यांनीं लावलेले शोध लागून मनुष्य जातीच्या सुखांत भर कशी पडती? तात्पर्य कोणाहि व्यक्तीनें आपली शक्ति कमी लेखण्याचें कारण नाहीं. "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" ही म्हण कोण

बरें खोटी म्हणेल ? आम्ही प्रत्यक्ष परमेश्वराची बालकें असून, त्यानें आम्हांला उन्नति करून घेण्याची सर्व साधनें दिलीं असून, आम्ही । आपलें हें नातें विसरून पोरक्या पोरांप्रमाणें हताश होऊन बसावें, हें आम्हांला शोभण्यासारखें नाहीं. आम्ही "सर्वेशाचीं बाळें" आहों. आमचा अधिकार व दर्जा श्रेष्ठ आहे. त्या परमेश्वराला शोभण्यासारखें आमचें बाणेदारपणाचें वर्तन असावें, आपण संकटांना न भितां, वरवर दिसणाऱ्या अन्यायांनीं फसून न जातां. परमेश्वरावर निष्ठा ठेवून तो आमचा जिवलग मित्र आहे, तो आम्हांला मदत करण्याला एका पायावर तयार असून कधींहि दगा देणार नाहीं, असा विश्वास ठेवून, त्याच्यावर प्रेम ठेवून आपलें कर्तव्य करीत राहणें व तें करण्यांतच सुख अनुभवणें, ह्यांतच आमचा खरा मोठेपणा आहे.



—जे सत्पुरुष असतात ते सहसा बोलत नाहीत. स्वतःस बुद्धिमान् समजणारे मात्र बडबड करतात; आणि जे फाजील शहाणे असतात ते कारणमीमांसा करण्यांत वेळ दवडतात.

*　　*　　*

—संसारांत राहूनही संन्यस्त वृत्तीनें वागतां येतें. त्यांत गुरफटून नाहीं गेलें म्हणजे झालें. संन्यासी व्हायला भगवीं वस्त्रें धारण करायला नकोत. भगवीं वस्त्रें धारण करून इकडे तिकडे भटकणारा व स्वतःस संन्यासी समजणारा तो संन्यासीच नव्हे.

—रमण महर्षि

# संतकवि महिपती

अहमदनगरापासून सुमारें सोळा सतरा कोसांवर राहुरी ताळुक्यांत प्रवरेच्या दक्षिणेला ताहराबाद या नांवाचें एक गांव आहे. त्या ठिकाणीं दादोपंत या नांवाचा एक देशस्थ ब्राह्मण राहत असे. तो ऋग्वेदी असून वासिष्ठगोत्रज होता. त्याला गंगाबाई या नांवाची भाग्यशाली पत्नी होती. दादोपंत हा कुळकर्णीचें काम करून उदरनिर्वाह करीत असे. हें जोडपें कन्यारत्नांनीं संपन्न होतें. त्यांना कित्येक दिवसपर्यंत पुत्रप्राप्ति नव्हती. पण त्या पुण्यवान् दंपत्याच्या पूर्व भाग्याचा उदय होऊन दादोपंताच्या उतारवयीं म्हणजे साठाव्या वर्षी त्याला सौभाग्यवती गंगाबाईच्या पोटीं एक पुत्ररत्न प्राप्त झालें. तोच महाभाग्यवान् महिपति होय.

महिपति रूपानें फार देखणा होता. महिपति हा पुष्कळ मुलींच्या पाठीवर म्हातारपणीं झालेला मुलगा असल्यामुळें दादोपंत व गंगाबाई त्याला अगदीं जीव कीं प्राण करीत. त्यांना तो खरोखरीच स्नेहरसाचें मुख्य बीज असें वाटे. मातृपितृ-प्रेमाच्या आर्द्रतेनें उचंबळून जाऊन त्या दोघांनीं आपल्या प्रापंचिक स्थितीस शक्य तेवढ्या रीतीनें आपल्या लाडक्या मुलाचें लालनपालन केलें. ब्राह्मणधर्मास अनुसरून महिपतीचा मौंजीबंधनविधि पार पडला. महिपति मोठासा विद्वान झाला नव्हता. त्यानें निर्वाहापुरतें जें काय शिक्षण मिळविलें तेवढ्यावरच तो आपल्या वयाच्या सोळावे वर्षी आपल्या बापाचें काम करूं लागला.

महिपतीला ईशपुजन करण्यांत अत्यंत हर्ष वाटे. ईश्वराच्या पूजाविधानावर त्याची पराकाष्ठेची निष्ठा बसली. कोणे एके दिवशीं महिपति आपल्या कामानिमित्त कचेरींत गेला होता. उपजिविकेला साधनीभूत म्हणून अवश्य करावें लागणारें काम उरकून तो घरीं परत आला आणि निश्चळ व स्वस्थ मनानें आपल्या ध्येय मूर्तींची पूजा करण्यांत रममाण झाला. इतक्यांत त्याला कांहीं कामाकरितां सरकारांतून मोठ्या तातडीनें बोलावणें आलें. त्याला पुकारण्यास आलेला सेवक जातीनें रांकट व गांवढळ होता. त्याचा निरोप ऐकतांच महिपतीनें शांततेनें उत्तर केलें, "तुम्ही कांहीं वेळ थांबाल तर मी देवाची पूजा पुर्ण करून तुमच्याच बरोबर येतों."

त्या सेवकानें आपल्या कर्तव्यानुसार परत जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यास महिपतीचा सयुक्तिक जबाब कळविला असतां तरी त्या थोर अधिकाऱ्यानेंही

महिपतीवर थोड्याशा सवडीची कृपा खात्रीनें केली असती! पण तसें न करितां त्यानें महिपतीवर तोंड टाकून कांहीं अपशब्दांचा उच्चार केला. त्यायोगानें महिपतीच्या अंतःकरणास फार क्लेश वाटले. पण त्या नम्रतासंपन्न ब्राह्मणानें आपले क्लेश तसेच दाबून ठेवून आपली पूजा तशीच अर्धवट टाकली आणि आपला पोषाख धारण करून तो कांहींएक भाषण न करतां कचेरीच्या रस्त्यास लागला.

कचेरींत जाऊन पोंचतांच त्यानें जें काय काम उद्भवलें होतें तें यथास्थितपणें उरकलें आणि त्याच पावलीं तो निमूटपणें आपल्या घरीं परत आला. पुन्हा हात पाय धुऊन तो आपली पूजा संपविण्याकरितां पांडुरंगापुढें बसला. कचेरींतील काम आटपल्यानंतर त्यानें आपली लेखणी कानांत खोंवलेली होती ती अद्याप तशीच कानावर होती. महिपतीनें लागलीच ती लेखणी पांडुरंगाच्या चरणावर वाहून असा उच्चार केला कीं, "पांडुरंगा! या लेखणीमुळें तुझ्या चरणसेवेंत व्यत्यय उत्पन्न होतो; एतदर्थ आजपासून मी गांवकृत्यासंबंधानें लेखणी हातांत धरणार नाहीं. आजपासून पुढेंहि माझ्या सात पिढ्यांतील वंशजांनींहि माझेंच अनुकरण करावें अशी मी आजच त्यांना शपथ घालून ठेवतों." असें बोलून त्यानें विठ्ठलचरणावर मस्तक ठेविलें आणि पूजाविधीची समाप्ति केली.

दादोपंतही विठ्ठलभक्त असल्यानें ते नेहमीं पंढरीची वारी करीत. महिपतीनें ईशचरणाला लेखणी वाहिली त्यासमयीं दादोपंत अगदींच थकले होते. वारी करण्यास ते साधारणतः असमर्थच झाल्यासारखे होते. तें पाहून त्यांचें वाऱ्या करण्याचें काम त्यांच्या पुत्रानें स्वीकारलें.

हा वेळपर्यंत महिपतीला ग्रंथलेखनाचें सामर्थ्य होतें कीं नव्हतें ही गोष्ट शंकितच आहे. आतांपावेतों त्यानें कधींही ग्रंथलेखन केलें नव्हतें एवढें मात्र निश्चित होय. महिपति वारकरी बनून पंढरीच्या यात्रेनें आपले पाय पावन करूं लागला. पांडुरंगाच्या दिव्यदर्शनानें, त्याच्या चरणध्यानानें, त्याच्या नामस्मरणानें महिपतीच्या अंतर्बाह्य मलाचें क्षालन झालें. असें या भगवत्स्वरूप तुकोबारायांनीं महिपतीला स्वप्नामध्यें दर्शन देऊन असें सांगितलें कीं, "हे भाग्यशाली पवित्र भगवद्भक्ता, नामदेवानें जो शतकोट अभंग करण्याचा संकल्प केला होता त्याची पूर्तता करण्याचें पुण्य प्रभुकृपेनें माझ्या पदरांत पडलें आतां तुझ्या मुखांतून संतजनांचें चरित्र वर्णन व्हावें अशी हरीची आज्ञा आहे." इतकें बोलून तुकोबांनीं त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेविला आणि ते गुप्त झाले. महिपति जागा झाला. स्वप्नांतील सर्व चमत्कार त्याच्या मनांत घोळतच होता. सामान्य जनांचे स्वप्नाभास आणि महिपतीसारख्या हरिप्रियांची स्वप्नदशा यांत जमीन अस्मानाचें अंतर

असावयाचेंच! तुकोबाच्या अमृतस्पर्शामुळें महिपतीस एकाएकी स्फूर्ती होऊन तो कवित्व करण्याच्या सामर्थ्यानें संपन्न झाला. त्यानें जें जें उत्कृष्ट ग्रंथलेखन केलें ते सर्व ओवीबद्ध आहे.

कवित्वाच्या साधनानें तो हरिसेवा करूं लागल्यानंतर त्यानें ताहराबाद येथे एक देवालय बांधून त्यांत पांडुरंगाची बाळकामूर्ति स्थापली. तो नित्य त्या देवालयांत बसून प्रभुध्यान करी. या प्रकारें बरेंच कालक्रमण झाल्यानंतर देशामध्यें भयंकर दुष्काळ पडला. ज्यावर्षी ही आपत्ती गुदरली त्या वर्षास करंड्याचें वर्ष असें म्हणण्याचा प्रघात आहे. दुष्काळांतील धान्याच्या टंचाईमुळें अनेक लोक उपाशी मरूं लागले. परक्लेश पाहतांच महिपतीचें मन अर्थातच कळवळलें. महिपतीनें परोपकाराचें तत्व जाणलें होतें. तो श्रेष्ठ भक्त लागलीच जनपीडा निवारणार्थ सज्ज झाला. गोरगरीबांचे प्राण वाचविण्याकरितां प्रथमतः त्यानें आपलें घर लुटविलें. दर तीन वर्षांनीं हें असें कृत्य करण्याचा त्यानें तेव्हांपासून प्रघातच पाडला. अशी गोष्ट सतत निभावयाची नाहीं अशा समजुतीनें कित्येक लोकांनीं घर न लुटविण्याबद्दल त्याची प्रार्थना केली. त्याच्या शब्दास मान देण्याकरितां मग त्यानें तो प्रकार बंद करून पांडुरंगाचा उत्साहच चालूं केला. प्रतिवर्षी आषाढ शु. १० पासून ३० पर्यंत हा उत्साह करण्याचा महिपतीनें जो क्रम घालून दिला तो तसाच अद्यापही चालूं आहे. अशा-प्रकारचा हा प्रख्यात कवि, अनन्यभक्त, कृपापर, परोपकारी, औदार्यसंपन्न संतजन आपल्या वयाच्या ७५ वे वर्षी समाधिस्थ झाला. या महात्म्याचा जन्म शके १६३७ म्हणजे इ. स. १७१५ मध्यें होऊन शके १७१२ म्हणजे इ. स. १७९० च्या श्रावणवद्य द्वादशीस त्याचें निजधामगमन घडलें. म्हणजे महिपतीसारखें अमूल्य रत्न भरतभूमीतून नाहींसें झाल्यास आज सरासरी सवाशें वर्षें लोटलीं!

# नामदेवांची अमृतवाणी [ हिंदी ]

अनुवादक : **गणेश विष्णु कविटकर, एम. ए.**

### एवडीसी मानै बुधि आवडी

माझ्या मनाला आतां एवढीच आवड आहे की एक क्षणभर देखील रामाचा विसर पडूं नये. हरिनाम घेण्यास ज्या मनुष्यास लाज वाटते त्याच्या डोक्यावर यमदंडाचा तडाखा बसेल. हरिनाम स्मरण करतांना व्यर्थ गोष्टी करूं नयेत, म्हणजे आपण केलेल्या पापाचा होम केला जाऊन ते नष्ट होईल. नामदेव म्हणतात, मी हरि हरि म्हणत असतो त्यामुळें पापाचा उच्छेद होऊन मोठा लाभ होतो.

### ऐसे जगथैं दास नियारा

जगामध्यें असा निराळाच पंडित भक्त असतो की ज्याने वेद पुराणे वाचून असा विचार केला आहे. दही घुसळून जसे तूप काढल्यानंतर ते पुन्हां दह्यांत एकत्र होत नाहीं ( पुन्हां तूपाचे दही होत नाहीं ); अग्नि लाकडास जाळून टाकतो आणि नंतर लाकूड शिल्लक राहात नाहीं; परिसाने स्पर्श केलेले लोखंडाचे सोने होते परंतु त्याचे पुन्हां लोखंड होत नाहीं; आक, पळस इत्यादि वृक्ष चंदनाने विद्ध झाले असता ते चंदनरूप होतात; त्यांना कोणी लाकूड म्हणत नाहीं, चंदनच म्हणतात. त्याप्रमाणे जे भक्त रामनामांत रंगून त्यांतच रममाण झाले व ज्यांची कर्म लालसा सुटली ते भक्त रामासमान समजून दास नामदेव त्यांना प्रणाम करतो.

### हमारै गोपाळराजा गोपाळराजा

आमचा राजा भगवान गोपाळ आहे. आणखी शेंकडो देव कांहीं कामाचे कोणाला प्राचीन वेद हेंच धर्मशास्त्र वाटते तर माझ्या मनाला परमेश्वराचे चरणकमल आवडतात. कोणाचे कोट्यावधी रुपयांच्या लक्ष्मीभांडारावर ध्यान असते, परंतु मला मात्र रामनामाचा आधार वाटतो. कांहींचे हिंडणें, फिरणें हत्तीच्या संगतींत होते; पण माझा सांगाती म्हणजे रामनाम. ज्याचें यश सर्व लोकांत गाजत आहे, दुमदुमत आहे, त्या हरीच्या ठिकाणीं नामदेवांचे चित्त लागले आहे.

## कहि मन गोविंद गोविंदा

हे मना! तूं हरिचरण कमलाचे चिंतन विसरला आहेस. आतां तरी गोविंद गोविंद म्हण. मी माझ्या अंतःकरणात गर्भवासाचे दुःख फार सहन केले आहे आणि जन्ममरणाच्या चक्रात सापडलो आहे. म्हणून नामदेव हरीचे गुण गातो व संसार-सागराच्या जवळसुद्धां येऊं इच्छित नाहीं.

## कांइ रे भूले मूढे जना

हे मूढ मानवा! तूं भुललास काय? हे चामड्याचे केलेले शरीर आपले नव्हे! तूं ज्याला आपला देह समजतोस तो तांबडे रक्त व मांस यांची घाण आहे. नामदेव म्हणतात, नारायणा! रामनामाशिवाय राहाणाऱ्या जीवांना धिक्कार असो—

(भक्तिशिवाय जीवन व्यर्थ आहे.)

## जौ लग राम नामै हित न भयौ

जोपर्यंत रामनामाचे प्रेम उत्पन्न होत नाहीं, तोपर्यंत मायामोहांत गुंतून सारा जन्म नष्ट होत राहिला. सारा जन्म घालविला तरी अंगाला लागलेला चिखल निघणार नाहीं, कारण हे कर्मकांडी लोक चिखलानेंच तो चिखल काढूं इच्छितात. अंतरंग काळेकुट्ट असले आणि बाहेरचे आवरण स्वच्छ असले तरी काय उपयोग? व त्याला पाण्यानें किंवा मातीनें कितीहि धुतले तरी ते स्वच्छ कसें होणार? नामदेव म्हणतात, संतसाधु लोकच संसाररूपी समुद्राला पार करून नेवूं शकतात. अज्ञानी मनुष्याला विचारून हा संसाररूपी सागर कसा काय पार करणार? (अशा प्रकारचे कर्मकांडाचा आधार घेणारे लोक बकरीच्या शेपटीच्या आधारे भवसागर तरून जाऊं इच्छितात.)

## भगति आपि मोरे बाबुला

हे माझ्या परमपूज्य विठ्ठला! मला तुझ्या भक्तीचे दान दे. मी तुझ्याकडे मुक्ति मागत नाहीं. तूं जर मला भक्तीचे दान दिलें नाहींस व या दासाला कोटी करांनीं जरी अडविलेस तरी तो भक्ति सोडणार नाहीं. अनेक जन्म भटकत फिरलों आणि तुझ्या नामाचा आधार घेऊन (आतां) उद्धरलों. नामदेव म्हणतात, तूं माझे जीवन आहेस. तूं समुद्र तर मी त्यांतील एक मासा आहे.

# गीतेचा अभ्यास केव्हा करावा ?

—गीताभ्यासी कै. शा. वि. देशपांडे

गीता कोणत्या वयांत वाचावी ? सामान्यतः अशी समज आहे कीं गीतावाचन हें म्हाताऱ्या लोकांचें काम आहे, पण ही समजूत चुकीची आहे. पूर्व वयांत अंगांत तारुण्याचा मद असतो व प्रापञ्चिक विचार प्रबळ असतात. अशा काळांत अध्यात्मज्ञानाकडे सहाजिकच दुर्लक्ष असतें. पुढें संसाराचे बरे वाईट अनुभव आले, आपत्ति कोसळल्या, अडचणींनीं गांठलें, म्हणजे ईश्वराकडे मन धांवूं लागतें. संसारकाम करून थकल्यावेळीं—म्हातारपणांत—दुसरें काम करितां येत नाहीं, अशी स्थिति झाली म्हणजे गीतेसारखे ग्रंथ वाचण्याकडे प्रवृत्ति होते हें खरें. पण ज्ञान म्हणजे ज्ञानच. त्याच्यासारखें पवित्र दुसरें कांहीं नाहीं (गी. ४।३८), व सर्व विद्यांत आत्मविद्या श्रेष्ठ (गी. १०।३२). असें आहे तर, तें जितक्या लौकर संपादन करतां येईल तितकें अधिक श्रेयस्कर होईल. गीतेच्या तत्त्वज्ञानानें वृद्धाच्या मनाला शांति मिळेलच, पण गीता ही कर्म करण्यासाठीं सांगितलेली असल्यामुळें कर्म करण्याची शक्ति नाहींशी झालेल्या म्हातारपणापेक्षां तरुणपणांतच तिचें अध्ययन अधिक श्रेयस्कर होईल. ईश्वराकडे लक्ष लागून, प्रपंचांतील अनेक अडचणींतून, समाधानवृत्तीनें, वाट काढून बाहेर पडण्याचें धैर्य प्राप्त होईल यांत संशय नाहीं.

या बाबतींत लो. टिळक यांनीं आपल्या गीतारहस्याच्या प्रस्तावनेच्या अखेर अशी विनंती केली आहे. "निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीनें संसार करून थकल्या भागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ म्हणून किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणून, गीता सांगितलेली नसून, संसारच मोक्षदृष्ट्या कसा केला पाहिजे व मनुष्यमात्राचें संसारांतील खरें कर्तव्य काय याचा तात्त्विकदृष्ट्या उपदेश करण्यासाठीं गीताशास्त्राची प्रवृत्ति झाली आहे. म्हणून पूर्व वयांतच गृहस्थाश्रमानें किंवा संसाराचें हें प्राचीन शास्त्र जितक्या लौकर समजून घेणें शक्य असेल तितक्या लौकर प्रत्येकानें समजून घेतल्याखेरीज राहूं नये, एवढीच आमची शेवटची विनंति आहे."

कर्तव्य करण्यासाठीं हिंदुमात्राला—इतरांना देखील—केलेली ही विनंति म्हणजे बहुमोल उपदेश आहे. पूर्ववयांत केलेल्या या शास्त्राच्या अभ्यासाचा परिणाम दीर्घ-काळपर्यंत उपकारक होईल यांत शंका नाहीं.

# बाल-संत चंद्रहास

**लेखक : ना. त्र्यं. जवारकर, धुळें**

केरळ देशचा आधिपति मेधावी याचा चंद्रहास हा पुत्र होय. तो तीन वर्षांचा असतांनाच परचक्र येऊन मेधावी रणांत पतन पावला. राणीनें सहगमन केलें. दासीनें चंद्रहासास बरोबर घेऊन फिरत फिरत कुंतलपुरास नेलें. तेथील दुष्टबुद्धी प्रधानाचे घरीं चाकरीस राहिली. पुढें ही दासी लवकरच वारली. आईबापावेगळा दीन होऊन फिरत असतां चंद्रहासाची व नारदाची भेट झाली, नारदांनीं त्याला पूजेकरतां शाळिग्राममूर्ती देऊन सर्व पूजाविधी समजावून दिलें. एकदा दुष्टबुद्धीचे मुलांत खेळत असतां एका विद्वान ब्राह्मणानें हा तुझा जांवई होईल; असें भविष्य कथन केलें. आपली मुलगी दासीपुत्रास द्यावी लागूं नये म्हणून त्याला मारेकऱ्यांकडून ठार मारण्यासाठीं वनांत पाठवून दिलें. नारदानें दिलेला शाळिग्राम चंद्रहास नेहमीं तोंडांत ठेवीत असे; मारेकरी आपणांस मारणार असें लक्षांत येतांच चंद्रहासानें देवाची पूजा करण्यासाठीं वेळ मागून घेतला. तोंडांतून शाळिग्राम बाहेर काढून जगजीवनाची स्तुति केली. व नंतर मरणास तयार झाला. मारेकऱ्यांस त्याची देवभक्ति पाहून दया आली व त्यास जिवें न मारतां त्याचे एका पायास सहावी अंगळी होती ती कापून घेऊन दुष्टबुद्धीस दाखविण्यास घेऊन गेले. त्याचवेळीं त्या वनांत चंदनावतीचा कलिंगराव राजा शिकारास आला होता. त्याचे दृष्टीस चंद्रहास पडला. त्यास राजानें घरी नेऊन त्याचें पुत्रवत् पालन केलें.

पुढें दुष्टबुद्धीची मुलगी विषया हिचेशीं चंद्रहासाचें लग्न करण्याचें ठरलें. चंद्रहास फिरत फिरत वनांत थकला व एका झाडाखालीं निजला. दुष्टबुद्धीनें त्यास ओळखलें व खिशांत पत्र लिहून यास विष देणें असें प्रधानास कळविलें. थोडक्यांत विषया तेथें आली. तिनें तो पुत्र पाहून हा आपला नवरा असावा. कोण ते पाहावें म्हणून ती जवळ गेली. ते पत्र पाहून 'विष' हें काय बापाचें लिहिलें! तिनें डोळ्यांतील काजळानें 'विषया' दे असें लिहिलें. प्रधानानें चंद्रहास व विषया यांचे लग्न लावून दिलें.

दुष्टबुद्धीनें नंतर आपल्या मुलांस पाठवून चंद्रहासास मारणेचें सुचविलें. लग्नानंतर देवीचे दर्शनास जाणेची रीत आहे. मुलानें स्वतः जाणेचे ठरविले. चंद्रहासास त्याप्रमाणे कळवून आपण त्याचा पोषाख घालून देवीचे दर्शनास गेला तेथें मारेकऱ्याने त्यांस मारले. चंद्रहासास हें समजतांच; तो देवीपुढें आपली मान कापणेस तयार झाला. देवी प्रसन्न होऊन तिने दुष्टबुद्धीचे मुलास उठाविलें व सर्वत्र आनंदी आनंद झाला.




## नोव्हेंबर १९६७

या महिन्यांत श्रीसाईबाबांचे समाधी दर्शनाकरितां बाहेरगांवची भक्त मंडळी नेहमीप्रमाणें आली होती, शिवाय महिन्यांतील कांहीं गुरुवार रविवार व सुट्टीचे दिवशी अलोट गर्दी झाली ती इतकी कीं, उत्सवात गर्दी होते त्याप्रमाणें झाली होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें:—

**कीर्तन**

श्रीमती गंगामाई कदम नाशिककर ( मु. पंचवटी—नाशिक )

श्री. ह. भ. प. सदाशिव बाळा टेमगिरे ( गणेगांवची बुरुंडवाडी ) ता. शिरूर जि. पुणें.

संस्थान गवई मराठे यांची कीर्तनें या महिन्यांत नेहमीप्रमाणें झाली. श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथीप्रित्यर्थ कीर्तन झाले.

**गायन**

श्री. त्रिपुरी शंकर रामशंकर त्रिपाठी, अहमदाबाद.

सौ. शकुंतला जोशी, नाशिक.

**भजन**

एन्. टी. भट्ट अँड पार्टी उत्तूर ( साउथ कॅनडा ) म्हैसूर.

**नकला**

श्री. दत्तात्रय पांडुरंग बेलसरे, मु. उखलगांव, ता. श्रीगोंदा, जि. अ नगर.

**जादूचे प्रयोग**

श्री. भिकन बाळा धोतरा ( कोपरगांव ), जि. अ. नगर.

### दिपवाळी

श्रीमहालक्ष्मी सरस्वती पूजन मे. माननीय डी. डी. पाटणकर कोर्ट रिसीव्हर साहेब ( श्री. सा. से शि. ) यांचे शुभहस्ते मोठ्या थाटांत झालें. त्यानिमित्त दीपोत्सव व शोभेचे दारू फटाकडे वगैरे रोषनाई करण्यांत आली होती.

### कार्तिक महा एकादशी

श्रीचे पालखीची गांवांतून मिरवणूक व कीर्तन झालें.

### तुलसी विवाह

श्रींचे द्वारकामायींत तुलसी विवाह मोठ्या थाटामाटांत झाला. स्वतः मे. माननीय कोर्ट रिसीव्हर साहेब या कार्यक्रमास हजर होते.

### ले. ग. सिलमसाहेब

मे. ले. गव्हर्नर पांडिचरी सयाजीराव ल. सिलमसाहेबसहकुटुंब श्रीसाईदर्शनास आले होते.

मे. टी. पी. गोडसेसाहेब चारिटी कमिशनर ( महाराष्ट्र–राज्य )

### श्री. सगुणराव नाईक यांचें निधन

या महिन्यांतील विशेष श्रीसाईबाबांचे हयातींत त्यांचे सन्निध ज्यांचे वास्तव्य अधिक काल घडून आले असे प्रसिद्ध साईभक्त कै. सगुणराव नाईक उर्फ सगुणमामा हे दि, ५–११–१९६७ रोजीं वयाच्या ८३ व्या वर्षी कालवश झाले. त्यांचे दुःखद निधनामुळें साईभक्तांमध्यें अत्यंत हळहळ व्यक्त केली जात आहे. व श्रीसाई-बाबांच्या वेळेच्या चक्षुर्वैसत्यं अशा अनेक सुश्राव्य संतकथा ऐकविल्या जात असत त्यांस भक्तगण यापुढें कायमचा मुकला आहे असेंहि बोललें जात आहे.

कै. सगुणराव यांनीं आपली सर्व जंगम मिळकत मृत्युपत्रान्वयें श्रीसाईबाबा संस्थानला अर्पण केली आहे.

### शिर्डी येथील हवापाणी

पहांटे गारठा पडूं लागला आहे. बाकी हवा चांगली आहे. रोगराई कांहीं नाहीं.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

### श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगारकरकृत | २-०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00-37 |
| (2) | ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०५७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : द. दि. पाटणकर, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,